॥ श्री ॥

१३ ब्रह्मानन्दे अद्वैतानन्द:

ब्रह्मानन्द, विद्यानंद व विषयानंद असा आनंद तीन प्रकारचा आहे, असें अकराव्या प्रकरणांत सांगितलें आहे. पण त्याच्या पुढच्याच प्रकरणांकडे जों पहावें तों आत्मानंदसंज्ञक निराळ्याच एका आनंदाचें त्यांत प्रतिपादन केलेलें आढळतें. आणि त्यामुळें पूर्वापरविरोधाचा आभास होतो, असें कोणी म्हणेल, म्हणून ग्रंथकार सांगतात :-

योगानंद: पुरोक्तो य: स आत्मानंद इष्यताम् ।
कथं ब्रह्मत्वमेतस्य सद्वयस्येति चेच्छृणु ॥१

अन्वयार्थ - [य: योगानन्द: पुरा उक्त: स आत्मानन्द: इष्यताम् । सद्वयस्य एतस्य ब्रह्मत्वं कथं इति चेत् शृणु] जो योगानन्द म्हणून पूर्वीं सांगितलेला आहे, तोच आत्मानंद होय, असें समजावें. आतां द्वैतयुक्त अशा या आत्मानंदास ब्रह्मत्व कसें ? असें जर विचारशील तें सांगतों; ऐक.

प्रकाश:- ब्रह्मानन्द या शब्दानें ज्याचा उल्लेख केला आहे तोच योगानंद होय. चित्ताच्या एकाग्रतेमुळें होणाऱ्या आत्मसाक्षात्काराशीं त्याचा संबंध असल्यामुळें त्यास योगानंद असें म्हटलें आहे. प्रस्तुत योगरूपी उपाधिहि ज्याला नसते त्याला निजानंद म्हणण्याचा परिपाठ आहे. अर्थात् या संज्ञा जशा कांहीं निमित्तानें भिन्न झाल्या आहेत, त्याचप्रमाणें आत्मानंद ही संज्ञाहि नैमत्तिक किंवा औपाधिक आहे असें समजावें. म्हणजे वस्तुत: हे आनंद भिन्न नाहींत. **शंका:**- पण सजातीय पुत्रभार्यादिरूप गौण आत्मे: देहादि मिथ्या आत्मे व आकाशादि विजातीय पदार्थ ह्यांहून भिन्न असलेल्या व त्यामुळेंच सद्वितीय अशा या आत्मानंदास ब्रह्मत्व आहे असें कसें म्हणतां येईल? **समाधान:**- या तुझ्या शंकेचें सप्रमाण उत्तर देतों तें ऐक. ॥१॥

आकाशादिस्वदेहांतं तैत्तिरीयश्रुतीरितम् ।
जगन्नास्त्यन्यदानंदादद्वैतब्रह्मता तत: ॥२

अन्वयार्थ - [तैत्तिरीयश्रुतीरितं आकाशादिस्वदेहान्तं जगत् आनंदात् अन्यत् न अस्ति । तत: तस्य: अद्वैतब्रह्मता-] तैत्तिरीय श्रुतीनें आकाशापासून आपल्या देहापर्यंत सांगितलेलें जगत् आनंदाहून पृथक् नाहीं. तस्मात् या आत्मानंदास अद्वितीय ब्रह्मरुपता आहेच.

प्रकाश:- 'त्या ह्या सत्य, ज्ञान व आनंदरूप आत्म्यापासून आकाश झालें; आकाशापासून वायु झाला; वायूपासून तेज झालें; तेजापासून उदक झालें; उदकापासून पृथ्वी झाली; पृथ्वीमध्यें औषधी झाल्या; औषधींपासून अन्न झालें; अन्नापासून शरीर झालें; असें तैत्तिरीय-ब्रह्मविद्येमध्यें वर्णन आहे. त्यावरून हें सर्व जग आनंदरूपच आहे, त्याच्याहून मुळीं भिन्न नाहीं, असें ठरतें. तस्मात् या आत्मानंदास अद्वैतब्रह्मता आहे. म्हणजे हा आत्मानंद अद्वैतब्रह्मरूपच आहे, यांत कांहीं शंका नाहीं. ॥२॥

-अहोपण त्या श्रुतींत आत्म्याला जगाचें कारणत्व सांगितलें आहे, आनंदाला आकाशादि जगाचें कारणत्व सांगितलेलें नाहीं' अशी शंका घेऊन आनंदाचें कारणत्व प्रतिपादन करणाऱ्या त्याच श्ररुतीचें 'आनंदाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते०' इत्यादि वाक्य अर्थत: पढतात -

आनंदादेव तज्जातं तिष्ठत्यानंद एव तत् ।
आनंद एव लीनं चेत्युक्तानंदात्कथं पृथक् ॥३

अन्वयार्थ - [तत् आनंदात् एव जातम् -] तें आनंदापासूनच उत्पन्न झालें. [तत् आनंदे एव तिष्ठति-] तें आनंदामध्येंच राहतें [च आनंदे एव

लीनं-] व आनंदामध्येंच लीन होतें. [इति उक्तानंदात् कथं पृथक्-] तेव्हां उक्त आनंदाहून जगत् भिन्न कसें?

प्रकाश:- वर ज्या श्रुतिवाक्याचा उल्लेख केला आहे, त्यांत जरी आनंदापासून हें सर्व झालें असें म्हटलेलें नसलें तरी पुढच्या भृगवल्लींत तसा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्यावरून आनंद व आत्मा हे भिन्न पदार्थ नसून एकाच तत्त्वाचीं तीं भिन्न नांवें आहेत, असें होतें. या विषयीं अनुमान असें - जगत् आनंदाहून भिन्न नाहीं. कारण तें त्यांचें कार्य आहे. जें त्यांचें कार्य असतें तें त्याहून भिन्न नसतें. जसें मातीचें घटादि कार्य मातीहून पूथक् नाहीं. ॥३॥

-'पण कुंभारापासून झालेला घट जसा त्याहून भिन्न असतो तसेंच आनंदापासून उत्पन्न झालेलें जगत् आनंदाहून भिन्न राहूं शकेल !' अशी शंका व तिचें समाधान -

कुलालाद्घट उत्पन्नो भिन्नश्चेति न शंक्यताम् ।
मृद्वदेष उपादानं निमित्तं न कुलालवत् ॥४

अन्वयार्थ - [कुलालात् घट: उत्पन्न: भिन्न: च इति न शंक्यताम्-] **कुंभारापासून घट उत्पन्न झाला व तो त्याच्याहून भिन्न आहे, अशी शंका घेऊं नये. [मृद्वत् एष: उपादानम्-] कारण मृत्तिकेप्रमाणें हा आनंद उपादान कारण आहे. [कुलालवत् न निमित्तम्-] कुंभाराप्रमाणें निमित्त कारण नव्हे.**

प्रकाश:- कुंभाराप्रमाणें हा आनंद जर जगाचा कर्ता असता तर प्रस्तुत शंका बरोबर झाली असती. पण खरा प्रकार तसा नाहीं. म्हणजे हा आनंद जगाचें उपादान कारण आहे. कोणतेंहि कार्य उपादान कारणाहून पृथक् राहूंच शकत नाहीं, म्हणून जग हें आनंदाहून पृथक् आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. ॥४॥

-'पण कुंभारालाच घटाचें उपादानकारणत्व कां नाहीं ?' अशी शंका घेऊन 'स्थिति व लय यांचें आधारत्व' हें उपादानाचें लक्षण त्यांत नाहीं, असें उत्तर-

स्थितिर्लयश्च कुंभस्य कुलाले स्तो न हि क्वचित्।
दृष्टौ तौ मृदि तद्वत्स्यादुपादानं तयो: श्रुते: ॥५

अन्वयार्थ - [कुंभस्य स्थिति: च लय: कुलाले क्वचित् न स्त:-] कुंभाची स्थिति व लय कुलालामध्यें कधींच होत नाहींत. [तौ हि मृदि दृष्टौ-] तर घटाचे स्थिति-लय मृत्तिकेमध्यें होत असल्याचें दिसतें. [तद्वत् श्रुते: आनंद: जगत: तयो: उपादानं स्यात्-] त्याचप्रमाणें श्रुतिप्रमाणानें आनंद जगाच्या स्थिति-लयांचें उपादान कारण आहे.

प्रकाश:- कार्याची उत्पत्ति, स्थिति व लय हीं ज्याच्या योगानें होतात व ज्याच्यामध्यें होतात, तें त्याचें उपादान कारण होय. या नियमावरून मातीच्या घड्याचें उपादान कारण मृत्तिकाच आहे, कुलाल नव्हे, असा निश्चय करितां येतो. कारण उत्पत्ति, स्थिति व लय या तिन्ही कालीं मृत्तिकेस घट सोडून राहूं शकत नाहीं. कुंभारास सोडून राहूं शकतो; म्हणजे स्थिति व लय या अवस्थेंत त्याला कुंभाराची कांहीं गरज नसते. याप्रमाणें श्रुति माउली स्पष्टपणें सांगत असल्यामुळें स्थिति व लय या दोन्ही कालीं जग आनंदामध्यें राहात असतें, असा निश्चय होतो व त्यावरून तोच जगाचें उपादान कारण ठरतो. ॥५॥

-आनंदाचें स्वत:ला इष्ट असलेलें जगदुपादानत्व सांगण्यासाठीं उपादानाचे अवांतर भेद सांगतात --

उपादानं त्रिधा भिन्नं विवर्ति परिणामि च ।
आरंभकं च तत्रांत्यौ न निरंशेऽवकाशिनौ ॥६

अन्वयार्थ - [विवर्ति, परिणामि च आरंभकं इति उपादानं त्रिधा भिन्नं अस्ति-] विवर्ती, परिणामी व आरंभक असें उपादान तीन प्रकारें भिन्न असतें, त्याचे तीन प्रकार आहेत [तत्र अत्यौ भेदौ निरंशे अवकाशिनौ न स्त:-] पण त्यांतील शेवटच्या म्ह० आरंभ व परिणाम या दोन भेदांस निरंश

आनंदाच्या ठिकाणीं अवकाशच नाहीं.

प्रकाश:- मायावादी वेदान्त्यांस विवर्तवाद इष्ट आहे. यास्तव सांख्यांस मान्य असलेल्या परिणामवादास व नैय्यायिकास इष्ट असलेल्या आरंभवादास दोष देण्याकरितां प्रथमत: उपादानाचे किती भेद आहेत तें येथें सांगितलें आहे. विवर्तोपादान, परिणामोपादान, आरंभोपादान असें उपादानकारण तीन प्रकारचें आहे. पण अंशशून्य आत्म्याच्या ठायीं आरंभ व परिणाम यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. ॥६॥

-त्यांना अवकाशच नाहीं, हें दाखविण्यासाठीं प्रथम आरंभवाद्याच्या मताचा अनुवाद करितात -

आरंभवादिनोऽन्यस्मादन्यस्योत्पत्तिमूचिरे ।
तंतो: पटस्य निष्पत्तेर्भिन्नौ तंतुपटौ खलु ॥७

अन्वयार्थ - [आरंभवादिन: अन्यस्मात् अन्यस्य उत्पत्तिं ऊचिरे-] वैशेषिकादि आरंभवादी कार्याच्या अपेक्षेनें भिन्न असलेल्या कारणापासून कारणाच्या अपेक्षेनें भिन्न असलेल्या कार्याची उत्पत्ति होते, असें म्हणतात त्यांनीं असें सांगितलें आहे. तें कां ? [तंतो: पटस्य निष्पत्ते:-] कारण तंतूंपासून पट उत्पन्न होत असल्याचे दिसतें. पण तेवढ्यावरून कार्य-कारणभेदाची सिद्धि कशी होते ? उत्तर - [तन्तुपटौ भिन्नौ खलु-] तंतु व पट हे अगदीं भिन्न पदार्थ आहेत, हें प्रसिद्ध आहे. कारण त्यांचे परिणाम विरुद्ध व उपयोगहि भिन्न आहेत.

प्रकाश:- वैशेषिक, नैय्यायिक इत्यादि तार्किक आरंभवादी आहेत. ते तंतु, मृत्तिका इत्यादि अन्य पदार्थांपासून वस्त्र, घडा इत्यादि अन्य पदार्थांची उत्पत्ति होते, असें सांगतात व त्यांना तसें म्हणण्यास सबल कारणहि आहे. तंतूपासून वस्त्र होतें व तंतु आणि वस्त्र हे भिन्न भिन्न पदार्थ आहेत हे प्रसिद्ध आहे. ॥७॥

- परिणामाचें स्वरूप सांगतात -

अवस्थांतरतापत्तिरेकस्य परिणामिता ।
स्यात्क्षीरं दधि मृत्कुंभ: सुवर्णं कुंडलं यथा ॥८

अन्वयार्थ - [एकस्य अवस्थांतरतापत्ति: परिणामिता-] एका पदार्थाचें अवस्थांतर होणें-पूर्वावस्था सोडून दुसऱ्या अवस्थेस प्राप्त होणें, हीच परिणामिता होय. [यथा क्षीरं दधि, मृत् कुंभ: च सुवर्णं कुंडलं स्यात्-] जसें दूध दहीं, मृत्तिका घट व सुवर्ण कुंडल होतें.

प्रकाश:- दुधाचें दहीं होणें, मृत्तिकेची घागर होणें, सुवर्णाचा अलंकार होणें, बीजाचा वृक्ष होणें इत्यादि हे सर्व परिणाम होत, पदार्थांचें एक स्वरूप जाऊन त्यास दुसरें प्राप्त होणें, हेंच परिणामाचें लक्षण आहे. ॥८॥

-आतां विवर्ताचें लक्षण सांगतात -

अवस्थांतरभानं तु विवर्तो रज्जुसर्पवत् ।
निरंशेऽप्यस्त्यसौ व्योम्नि तलमालिन्यकल्पनात् ॥९

अन्वयार्थ - [रज्जुसर्पवत् अवस्थांतरभानं तु विवर्त:-] रज्वादिरूपानें स्थित असलेल्या पदार्थाचा सर्पादिरूपानें भास होणें, हा विवर्त आहे. 'अहोपण सर्पादि रूपानें भासणारे रज्वादि पदार्थ सावयव असतात, त्यामुळें निरवयव पदार्थाचा विवर्तहि संभवत नाहीं.' अशी शंका घेऊन म्हणतात - [असौ निरंशे अपि अस्ति-] हा विवर्त निरवयव पदार्थाचे ठिकाणींहि होतो. [व्योम्नि तलमालिन्यकल्पनात्-] आकाशावर तल-उपड्या कढईच्या आकाराचा तळ व मालिन्य-नीलवर्ण यांची कल्पना होते. आकाशाचें स्वरूप न जाणणारे त्यावर असा आरोप करितात.

प्रकाश:- पदार्थ एक असतांना तो भलताच भासणें हें विवर्ताचें लक्षण होय. म्हणजे एकाद्याच्या पुढें दोरी पडलेली असतांना तो सर्प आहे असा भ्रम होणें हाच विवर्त होय. आतां हा विवर्तवाद तरी निरंश

पदार्थांच्या ठायीं सावकाश कसा होईल ? असें कोणी विचारील म्हणून ग्रंथकार म्हणतात - आकाश अंशरहित (अवयवशून्य) असतांनाहि त्याचा तळ लाल आहे, निळा आहे, करडा आहे, पांढरा आहे. इत्यादि प्रकारें भ्रम होत असल्याचें दिसतें. तसाच निरंश आत्म्याच्या ठायींहि जगाचा भ्रम होऊं शकतो. ॥९॥

-तात्पर्य -

ततो निरंश आनंदे विवर्तो जगदिष्यताम् ।
मायाशक्ति: कल्पिका स्यादैंद्रजालिकशक्तिवत् ॥१०

अन्वयार्थ - [तत: जगत् निरंशे आनंदे विवर्त: इष्यताम्-] याप्रमाणें निरवयव पदार्थावरहि विवर्त संभवत असल्यामुळें जगत् अंशरहित आनंदाच्या ठिकाणीं कल्पित आहे, असें समजावें. [ऐंद्रजालिक-शक्तिवत् मायाशक्ति: कल्पिका स्यात्-] गारुड्याच्या शक्तीप्रमाणें ईश्वराची मायाशक्ति त्याची कल्पना करणारी आहे.

प्रकाश:- सर्व श्लोकांत आकाशाचा दृष्टांत देऊन अवयवरहित पदार्थांवरहि भ्रम होतो हें दाखविलें आहे. त्याचप्रमाणें या निरंश आनंदावर या स्थावरजंगमरूप सृष्टीची कल्पना झालेली आहे. म्हणजे रज्जुरूप अधिष्ठानावर जशी सर्पाची कल्पना व्हावी तसाच हा सर्व प्रकार आहे, असें समजावें. गारुड्याची शक्ति जशी विलक्षण रचना करिते, त्याचप्रमाणें ईश्वराची शक्ति या विचित्र सृष्टीस निर्माण करिते. ॥१०॥

-अहो पण आत्म्याहून भिन्न अशा या मायाशक्तीचा अंगीकार केल्यास अद्वैताची हानि होईल !' उत्तर -

शक्ति: शक्तात्पृथङ्नास्ति तद्वद्दृष्टेर्न चाभिदा ।
प्रतिबंधस्य दृष्टत्वाच्छक्त्यभावे तु कस्य स: ॥११

अन्वयार्थ - [शक्ति: शक्तात् पृथक् न अस्ति-] शक्ति शक्तिमान् पदार्थाहून भिन्न नसते. [कुत: तद्वत् दृष्टे:-] कशावरून ? म्हणून म्हणशील तर 'भिन्न नसल्याचा प्रत्यय येत असल्यामुळें' - असें कारण आम्ही सांगतों. [च प्रतिबंधस्य दृष्टत्वात् अभिदा अपि न अस्ति-] त्याप्रमाणें तिच्या कार्यास प्रतिबंध होत असल्याचें दिसत असल्यामुळें ती पदार्थाशीं अभिन्नहि नाहीं. [शक्त्यभावे तु स: कस्य-] बरें शक्ति मुळीं नाहींत असें जर म्हणावें; तर प्रत्ययास येणारा प्रतिबंध कोणास होतो ?

प्रकाश:- शक्ति व शक्तिमान् हे वस्तुत: भिन्न पदार्थ नसतात. कारण ते भिन्न भिन्न आहेत असा साक्षात् प्रत्यय येत नाहीं. उदाहरणार्थ आपण अग्नि व त्याची दाहशक्ति घेऊं. अग्नीहून दाहशक्ति भिन्न आहे, असा कधींच अनुभव येत नाहीं. बरेंतर, ती पदार्थरूप असते असेंच समजा; असें जर म्हणशील, तर तसेंहि करितां येत नाहीं; कारण द्रव्य प्रत्यक्ष दिसतांनाहि त्याची शक्ति कांहीं उपायांनीं हटवितां येते. अग्नीची दाहशक्ति मणि, मंत्र, औषधि यांच्या योगानें कशी हटते हें सर्वप्रसिद्ध आहे. म्हणजे अग्नि एकसारखा जळत असतांनाहि पायांस कांहीं औषधी लावून लोक त्यांतून चालतात. त्यांना अग्नीपासून कोणत्याहि प्रकारची इजा होत नाहीं. शक्ति जर अग्निरूपच असती, तर ती त्याच्या बरोबरच राहाती व तिनें आपलें कार्यहि केलें असतें. पण तसें होत नाहीं. त्यामुळे शक्ति पदार्थरूपच आहे, असें म्हणतां येत नाहीं. पण असल्या या शक्तीचा स्वीकार करून तरी लाभ कोणता ? असें कोणी विचारील म्हणून ग्रंथकार म्हणतात, शक्तीचाच जर अंगीकार न केला, तर प्रतिबंध कोणास होतो ? म्हणजे उपायाची योजना केली असता कार्य होत नाहीं, असें जें आढळतें तें कां ? उपायाचा परिणाम कोणावर झाला? पदार्थ तर जशाचा तसाच समोर आहे. कार्य मात्र होत नाहीं. ॥११॥

-'पण अतींद्रिय शक्तीचा प्रतिबंध कसा जाणतां येणें शक्य आहे ?' उत्तर --

शक्ते: कार्यानुमेयत्वादकार्ये प्रतिबंधनम् ।
ज्वलतोऽग्नेरदाहे स्यान्मंत्रादिप्रतिबंधता ॥१२

अन्वयार्थ - [शक्तेः कार्यानुमेयत्वात् अकार्ये प्रतिबंधनं अवगम्यते-] शक्ति कार्यावरूनच जाणतां येण्यासारखी आहे, त्यामुळें तिचें कार्य न झाल्यास तिच्या प्रतिबंधाचें ज्ञान होतें. [ज्वलत: अग्ने: अदाहे मंत्रादिप्रतिबंधता स्यात्-] जळणाऱ्या अग्नीपासून दाह न झाल्यास मंत्रादिप्रतिबंधतेची कल्पना होते.

प्रकाश:- पदार्थाची शक्ति अतींद्रिय असते हें खरें; पण तिचें कार्यावरून अनुमान होतें. कारण असतांनाहि कार्य होत नाहीं असें आढळल्यास त्यास कांहीं तरी प्रतिबंध होत असावा, अशी सहजच कल्पना होते. याविषयीं अग्नीचाच दृष्टांत घेऊन पहा. अग्नि चांगला पेटलेला असूनहि त्यांतून चालणाऱ्या लोकांस तो भाजीत नसल्यास त्याची शक्ति मंत्रादि उपायांनीं प्रतिबद्ध झालेली असावी, असें कोणीहि समजेल. अर्थात् शक्ति जरी अतींद्रिय असली, तरी तिच्याविषयीं कार्यावरून अनुमान होतें. ॥१२॥

-याप्रमाणें लौकिक शक्तीचा प्रमाणत: व स्वरूपत: उल्लेख करून मायाशक्तीच्या अस्तित्वाविषयीं श्वेताश्वतरोपनिषदाचें वाक्य अर्थत: पढतात -

देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढां मुनयोऽविदन् ।
परास्य शक्तिर्विविधा क्रियाज्ञानबलात्मिका ॥१३

अन्वयार्थ - [मुनय: स्वगुणै: निगूढां देवात्मशक्तिं अविदन्-] मुनि स्थूलसूक्ष्मशरीररूप आपल्या गुणांनीं गुप्त होऊन राहिलेल्या देवाच्या आत्मशक्तीला साक्षात् जाणते झाले. [अस्य परा शक्ति: विविधा क्रियाज्ञानबलात्मिका श्रूयते-] या ब्रह्माची उत्कृष्ट शक्ति विविध म्हणजे क्रिया, ज्ञान व बलरूप आहे असें श्रुत आहे.

प्रकाश:- जगाचें कारण काळ आहे, परमाणु आहेत, प्रकृति आहे, स्वभाव आहे, इत्यादि वादांमध्ये दोष आहेत असें जाणणारे मुनीश्वर जगाचें खरें कारण काय आहे, हें जाणण्याच्या इच्छेनें ध्यानयोगामध्यें निमग्न होऊन जेव्हां पाहूं लागले, तेव्हां त्यांस स्वप्रकाशचिदात्म्याची मायारूप शक्ति आपल्या स्थूलसूक्ष्मशरीररूप गुणांमध्यें गुप्त होऊन राहिलेली आहे, असें दिसलें. म्हणजे त्यांस तिचा साक्षात्कार झाला. त्याचप्रमाणें या ब्रह्माची अति उत्तम शक्ति, क्रिया, ज्ञान, बल इत्यादि रूपांनीं अनेक प्रकारची आहे. या श्लोकाच्या दोन अर्धांत श्वेताश्वतरोपनिषदांतील दोन वाक्यांचा निर्देश केला आहे. ॥१३॥

-तात्पर्य -

इति वेदवच: प्राह वसिष्ठश्च तथाऽब्रवीत् ।
सर्वशक्ति परं ब्रह्म नित्यमापूर्णमद्वयम् ॥१४

अन्वयार्थ - [इति वेदवच: प्राह-] असें वेदवचन- श्वेताश्वतरोपनिषद्-सांगत आहे. [च वसिष्ठ: तथा अब्रवीत्-] वसिष्ठमुनींनींहि योगवासिष्ठांत मायाशक्तीचें तसेंच वर्णन केलें आहे. [सर्वशक्ति नित्यं आपूर्णं अद्वयं परं ब्रह्म अस्ति-] सर्वशक्ति, हें ब्रह्माचें सोपाधिक रूप व नित्य, परिपूर्ण, अद्वितीय हें त्याचेंच पारमार्थिक रूप आहे.

प्रकाश:- पूर्व श्लोकांत सांगितल्याप्रमाणें श्रुतीनें वर्णन केलें आहे. भगवान् वसिष्ठांनींहि श्रीरामचंद्रास असाच उपदेश केला आहे. तो कसा म्हणून विचारशील तर योगवासिष्ठांतील वसिष्ठवचनाचाच उल्लेख करून सांगतों:- हे प्रिय रामचंद्रा, जगामध्यें जेवढ्या शक्ति आहेत, त्या सर्व शक्तींनी संपन्न, त्रिकालाबाधित, परिपूर्ण व अद्वितीय असें पर, ब्रह्म आहे. या स्थळीं सर्वशक्ति हा शब्द ब्रह्माच्या सोपाधिक रूपाचा वाचक आहे. व इतर सर्व निरुपाधिक रूपाचे वाचक आहेत असें समजावें. ॥१४॥

- वसिष्ठवचनाचाच अनुवाद -

ययोल्लसति शक्त्यासौ प्रकाशमधिगच्छति ।
चिच्छक्तिर्ब्रह्मणो राम शरीरेषूपलभ्यते ॥१५

अन्वयार्थ - [तत् ब्रह्म यदा यया शक्त्या उल्लसति तदा असौ शक्तिः प्रकाशं अधिगच्छति-] तें ब्रह्म जेव्हां ज्या शक्तीनें विकसित होतें-विवर्त-अन्यथा परिणाम पावतें त्यावेळीं ती शक्ति व्यक्त होते, [हे राम ब्रह्मणः चिच्छक्तिः शरीरेषु उपलभ्यते-] हे रामा, ब्रह्माची चिच्छक्ति देवादिशरीरांमध्यें उपलब्ध होते.

प्रकाशः- ज्या वेळीं मायेच्या योगानें ब्रह्म विवर्त होतें, म्हणजे अन्यथाभावाप्रत प्राप्त होतें त्या वेळीं ही माया व्यक्त होते. कशी म्हणून म्हणशील तर सांगतों, बा रामचंद्रा, ब्रह्माची चैतन्यशक्ति देव, मनुष्यें, पशु, पक्षी इत्यादि सर्वांच्या शरीरामध्यें उपलब्ध होत असतें. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. ॥१५॥

- त्याचप्रमाणें --

स्पंदशक्तिश्च वातेषु दार्ढ्यशक्तिस्तथोपले ।
द्रवशक्तिस्तथांभःसु दाहशक्तिस्तथानले ॥१६
शून्यशक्तिस्तथाकाशे नाशशक्तिर्विनाशिनि
यथांडेऽतर्महासर्पो जगदस्ति तथात्मनि ॥१७

अन्वयार्थ - [च वातेषु स्पंदशक्तिः-] वायूमध्यें स्पंदनशक्ति, [तथा उपले दार्ढ्यशक्तिः-] दगडामध्यें दृढत्वशक्ति, [तथा अंभःसु द्रवशक्तिः-] जलामध्यें द्रवशक्ति, [तथा अनले दाहशक्तिः-] अग्नीमध्यें दाहशक्ति, [तथा आकाशे शून्यशक्तिः-] आकाशांत शून्यशक्ति, [च विनाशिनि नाशशक्तिः-] व विनाश पावणाऱ्या पदार्थांत नाशशक्ति असते [यथा अंडे अंतर् महासर्पः-] ज्याप्रमाणें अंड्यामध्यें मोठा सर्प असतो, [तथा आत्मनि जगत् अस्ति-] त्याप्रमाणें आत्म्यामध्यें जगत् असतें (यांत अव्यक्तदशेंतहि ब्रह्मामध्यें जगत्सत्ता असते, असें दाखविलें अंड्यांतील सर्पाचा दृष्टान्त अव्यक्ताच्याहि अस्तित्वाविषयीं आहे.

प्रकाशः- सृष्टींतील ज्या ज्या पदार्थांत जी जी शक्ति दिसते ती ती त्या ब्रह्माचीच शक्ति आहे असें तूं जाण. अंड्याच्या आंत मोठा थोरला भुजंग जसा गुप्त असतो, त्याप्रमाणें हें सर्व जग उत्पत्तीच्या पूर्वी आत्म्यामध्यें लीन असतें. ॥१६॥१७॥

-एका आत्म्यामध्यें हें विचित्र जगत् कसें राहतें याविषयीं दृष्टान्त देतात -

फलपत्रलतापुष्पशाखाविटपमूलवान् ।
ननु बीजे यथा वृक्षस्तथेदं ब्रह्मणि स्थितम् ॥१८

अन्वयार्थ - [ननु यथा बीजे फल-पत्र-लता-पुष्प शाखा-विटप मूलवान् वृक्षः-] खरोखर ज्याप्रमाणें बीजामध्यें फळें, पानें, शाखा, पुष्पें, खांद्या, पारंब्या, मुळें इत्यादिकांनीं युक्त असलेला वृक्ष रहातो, [तथा इदं ब्रह्मणि स्थितम्-] त्याप्रमाणें हें सर्व ब्रह्मामध्यें स्थित आहे.

प्रकाशः- अगदीं बारीक अशा एकाद्या बीजामध्यें ज्याप्रमाणें पुष्पफलादि अनेक विचित्र भागांनीं युक्त असा वृक्ष राहतो, त्याप्रमाणें विचित्र असें हें जग ब्रह्मामध्यें लीन होऊन राहतें. ॥१८॥

-'तर मग सर्व शक्तींचा एकदम उदय कां होत नाहीं ?' उत्तर --

क्वचित्काश्चित्कदाचिच्च तस्मादुद्यंति शक्तयः ।
देशकालविचित्रत्वात्क्ष्मातलादिव शालयः ॥१९

अन्वयार्थ - [क्ष्मातलात् शालयः इव-] पृथ्वीतलापासून उत्पन्न होणाऱ्या साळींप्रमाणें [देशकालविचित्रत्वात् तस्मात् शक्तयः क्वचित् कदाचित् काश्चित् च उद्यन्ति-] देश व काल यांच्या विचित्रपणामुळें त्यांच्यापासून क्वचित् विशेष प्रदेशीं केव्हां केव्हां व कांहीं थोड्याशाच शक्ति उत्पन्न होतात.

प्रकाशः- ज्याप्रमाणें भूमीवर योग्य समयीं पेरलेल्या धान्यांतील कांहीं धान्य उगवतें व तेंहि देश, काल इत्यादिकांची अपेक्षा धरितें, त्याप्रमाणें देश व

काल विचित्र असल्यामुळें तदनुरूपच शक्ती उदय पावतात. ॥१९॥

-जगत् कल्पनामात्र आहे, हें दाखविण्यासाठीं त्याची कल्पना करणाऱ्या मनाचें स्वरूप सांगतात -

स आत्मा सर्वगो राम नित्योदितमहावपु: ।
यन्मनाङ्मननीं शक्तिं धत्ते तन्मन उच्यते ॥२०

अन्वयार्थ - [हे राम, नित्योदितमहावपु: स: सर्वग: आत्मा-] हे रामचंद्रा, देश-कालादिकांनीं परिच्छिन्न न झालेलें व सदा प्रकाशमान असें ज्याचें स्वरूप आहे तो सर्वव्यापी आत्मा [यत् मनाक् मननीं शक्तिं धत्ते-] ज्या वेळीं थोडीहि मननशक्ति स्व-परज्ञानशक्ति धारण करितो [तत् मन: उच्यते-] तेव्हां त्याला मन असें म्हटलें जातें.

प्रकाश:- नित्योदित० सतत प्रकाशरूप असें महास्वरूप. अंत:करण थोडेसें मनन करूं लागलें कीं लागलीच त्यास मन ही संज्ञा प्राप्त होते. ॥२०॥

-आतां कल्पना कशी होते तें सांगतात -

आदौ मनस्तदनु बंधविमोक्षदृष्टी
पश्चात्प्रपंचरचना भुवनाभिधाना ।
इत्यादिका स्थितिरियं हि गता प्रतिष्ठा-
माख्यायिका सुभग बालजनोदितेव ॥२१

अन्वयार्थ - [आदौ मन: भवति-] प्रथमत: मननशक्तीच्या विकासानें मन होतें; [तदनु बंधविमोक्षदृष्टी भवत:-] नंतर बंध व मोक्ष या कल्पना होतात; [पश्चात् भुवनाभिधाना प्रपंचरचना- -] पुढें भुवनसंज्ञक प्रपंचरचना होते. [हे सुभग, इत्यादिका इयं स्थिति: बालजनोदिता आख्यायिका इव प्रतिष्ठां गता हि-] हे भाग्यशालिन्, अशी ही जगत्स्थिति बालकाला सांगितलेल्या कथेप्रमाणें सत्यत्वास प्राप्त झाली आहे.

प्रकाश:- अगदीं प्रथमत: मननशक्ति विकसित होते व त्यामुळें मनाची उत्पत्ति होते. मनाच्या उत्पत्तीनंतर बंध व मोक्ष यांची कल्पना होते; तदनंतर भुवन असें ज्याला म्हणतात तो प्रपंच होते. तो पर्वत, नगरें, नद्या, समुद्र, मनुष्य, पशु, पक्षी, वृक्ष, वेली इत्यादि सर्व स्थावरजंगमरूप असतो. तात्पर्य, अशा प्रकारें जिची केवल कल्पना झालेली असते, ती ही सृष्टि पुढें सत्यरूपानें भासूं लागते. म्हणजे राजपुत्रास सांगितलेली कल्पित कथा जशी खरी झाली तसाच हा सर्व प्रकार झाला. ॥२१॥

-आतां तीच वासिष्ठांतील कथा सांगतात -

बालस्यहि विनोदाय धात्री वक्ति शुभां कथाम् ।
क्वचित्संति महाबाहो राजपुत्रास्त्रय: शुभा: ॥२२
द्वौ न जातौ तथैकस्तु गर्भ एव न च स्थित: ।
वसंति ते धर्मयुक्ता अत्यंतासति पत्तने ॥२३
स्वकीयाच्छून्यनगरान्निर्गत्य विमलाशया: ।
गच्छंतो गगने वृक्षान् ददृशु: फलशालिन: ॥२४
भविष्यन्नगरे तत्र राजपुत्रास्त्रयोऽपि ते ।
सुखमद्य स्थिता: पुत्र मृगयाव्यवहारिण: ॥२५
धात्र्येति कथिता राम बालकाख्यायिका शुभा ।
निश्चयं स ययौ बालो निर्विचारणया धिया ॥२६

अन्वयार्थ - [बालस्य विनोदाय हि धात्री शुभां कथां वक्ति-] बालकाच्या मनोरंजनाकरितां दायी अशी शुभकथा सांगते. [हे महाबाहो, क्वचित् शुभा: त्रय: राजपुत्रा: संति-] हे सुंदर पुत्रा, कोणा एका गांवांत तीन शुभ कर्में करणारे राजपुत्र आहेत. [द्वौ न जातो तथा एक: तु गर्भे एव न स्थित:-] पण त्यांतील दोन उत्पन्न झालेले नाहींत व एक तर मातेच्या गर्भातहि आला नाहीं. [ते धर्मयुक्ता: संत: अत्यंतासति पत्तने वसंति-] ते तिघेंहि धर्म युक्त होत्साते 'अत्यंत असत्' या नांवाच्या एका नगरांत राहतात. [विमलाशया: ते स्वकीयात् शून्यनगरात्

निर्गत्य गच्छन्त: गगने फलशालिन: वृक्षान् ददृशु:-] ज्यांचें अंत:करण शुद्ध आहे असे ते राजपुत्र एकदा आपल्या शून्य नगरांतून निघून, जात असतांना, त्यांनीं अंतरिक्षांत फलांनीं युक्त असे वृक्ष पाहिले. [पुत्र, ते त्रय: अपि मृगयाव्यवहारिण: राजपुत्रा: तत्र भविष्यन्नगरे अद्य सुखं स्थिता: सन्ति-] हे पुत्रा ! ते तिघेहि मृगयाविहार करणारे राजपुत्र त्या भविष्यत् नगरांत आज सुखानें राहिलेले आहेत. असो: [हे राम, इति धात्र्या शुभा बालकाख्यायिका कथिता-] हे रामा, ह्याप्रमाणें धात्रीनें शुभ 'बालकाख्यायिका' सांगितली असतां, [स: बाल: निर्विचारणया धिया निश्चयं ययौ-] तो बालक विचारशून्य अशा बुद्धीनें तसाच निश्चय करिता झाला.

प्रकाश:- कोण्या एका अनिर्वचनीय मायाख्य गावांत सत्त्व, रज व तम हे तीन गुण राहत असत. ते अनादि असल्यामुळें त्यांतील दोघांचा जन्म झाला नव्हता व एक तर मातेच्या उदरांतहि आला नव्हता. ते तिघेहि मोठेपणीं अत्यंत असत् म्हणजे क्षणिक अशा शरीररूपी नगरांत राहूं लागले. कांहीं कालानें आपल्या शून्य (तत्त्वरहित) नगरांस सोडून ते सूक्ष्म शरीरासह बाहेर पडले व स्वैर फिरूं लागले; म्हणजे एका शरीरास सोडून ते देहरहित अशा अवस्थेंत दुसऱ्या देहांत जाण्याकरितां फिरूं लागले. इतक्यांत त्यांस आकाशांत म्हणजे आधाररहित अशा सूक्ष्म शरीरांत फळांनी भरलेले वासनारूपी वृक्ष दिसले व फळांनीं भरलेल्या वृक्षांच्या अरण्यांत मृगया करीत, फलोपभोग घेत, ते उत्तरजन्मरूपी नगरांत (शरीरांत) अद्यापि मोठ्या सुखानें वास्तव्य करीत आहेत. ज्ञानावांचून गुणांचा नाश होणें शक्यच नसल्यामुळें त्यांना अपाय झाला असेल किंवा त्याच्या सुखानें राहण्यांत कांहीं व्यत्यय आला असेल, अशी कल्पनाहि करावयास नको. असा या आख्यायिकेचा गूढार्थ आहे. ही कथा धात्रीनें त्या बालकास रचून सांगितलेली होती व त्यामुळें त्यांत सत्यांश मुळींच नव्हता; तरी बालकाची बुद्धि अगदींच विवेकशून्य असल्यामुळें त्यानें ती सर्व खरी स्थिति आहे असा निश्चय केला. ॥२२॥२३॥२४॥२५॥२६॥

-दृष्टान्तानें सिद्ध झालेला अर्थ दार्ष्टान्तिकांत योजून दाखवितात -

इयं संसाररचना विचारोज्झितचेतसाम् ।
बालकाख्यायिकेवेत्थमवस्थितिमुपागता ॥२७

अन्वयार्थ - [बालकाख्यायिका इव-] बालकास सांगितलेल्या कथेप्रमाणें [इयं संसाररचना विचारोज्झितचेतसां इत्थं अवस्थितिं उपागता-] ही संसाररचना विवेकशून्य पुरुषांच्या दृष्टीनें अशी खरी स्थित झाली आहे.

प्रकाश:- पूर्वोक्त कथेप्रमाणेंच अविवेकी पुरुषांच्या मनोरंजनार्थ तत्त्वज्ञानें सांगितलेली ही सृष्टीच्या उत्पत्तीची कथा त्यांनीं खरी मानिली आहे. पण हा सर्व कल्पनेचा बाजार आहे, त्यांत सत्याचा लेशहि नाहीं; हें एका तत्त्वज्ञान्यावांचून दुसऱ्या कोणासहि ठाऊक नाहीं; त्यामुळें अनेक अविवेकी आपसांत मोठा झगडा करीत असतात. त्यांतील प्रत्येक माझें किंवा माझ्या गुरूचें म्हणणें मात्र खरें, बाकी सर्वांचें खोटें, असें नि:शंकपणें प्रतिपादन करीत असतो. आणि या सर्वांचा परिणाम द्वेष, मतभेद, अभिमान इत्यादि दुष्ट विकारांत झाला आहे. पण तत्त्वज्ञ पुरुष हा सर्व चमत्कार पाहून नुसतें हंसत राहतो. कारण खोट्याकरितां भांडणाऱ्या ह्या मूर्खांकडे पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटतें. ॥२७॥

- आतां वसिष्ठवचनाचा उपसंहार -

इत्यादिभिरुपाख्यानैर्मायाशक्तेश्च विस्तरम् ।
वसिष्ठ: कथयामास सैव शक्तिर्निरूप्यते ॥२८

अन्वयार्थ - [इत्यादिभि: उपाख्यानै: वसिष्ठ: मायाशक्ते: विस्तरं कथयामास-] इत्यादि अनेक कथांच्या योगानें वसिष्ठ मायाशक्तीचा विस्तार

सांगते झाले. याप्रमाणें मायेच्या अस्तित्वाविषयीं प्रमाणाचा उपन्यास करून तिचें अनिर्वचनीयत्व सांगण्यासाठीं तिच्याच निरूपणाची ते प्रतिज्ञा करितात - [सा शक्ति: एव निरुप्यते-] त्या शक्तीचेंच आम्ही निरूपण करितों.

प्रकाश:- गेल्या तेरा श्लोकांत योगवासिष्ठांतील श्लोकांचाच अक्षरश: निर्देश केलेला आहे. तात्पर्य, असल्या अनेक कथांच्या योगानें श्रीवसिष्ठमुनींनीं मायाशक्तीचा विस्तार केला आहे. असो; आम्हीहि आतां त्या मायेचेंच निरूपण करितों. ॥२८॥

कार्यादाश्रयतश्चैषा भवेच्छक्तिर्विलक्षणा ।
स्फोटांगारौ दृश्यमानौ शक्तिस्तत्रानुमीयते ॥२९

अन्वयार्थ - [एषा शक्ति: कार्यात् च आश्रयत: विलक्षणा भवेत्-] ही मायाशक्ति आपल्या कार्यरूप जगाहून व आश्रयभूत ब्रह्माहून विपरीत स्वभावाची आहे, हेंच स्पष्ट करितात - [स्फोटांगारौ दृश्यमानौ-] अग्नीतील शक्तीचा कार्यरूप स्फोट - फोड व आश्रयरूप निखारा हे दोन्ही प्रत्यक्ष दिसतात. [तत्र शक्ति: अनुमीयते-] त्यांतील दाहशक्ति कार्यानुमेय-फोड या कार्यावरून अनुमान करण्यास योग्य आहे. त्यामुळें ती कार्य व आश्रय यांहून विलक्षण आहे.

प्रकाश:- ही मायासंज्ञक शक्ति तिचें कार्य जगत् व आश्रयभूत ब्रह्म, या दोघांहूनहि विलक्षण (निराळ्या लक्षणाची, विपरीत स्वभावाची) आहे. ती कशी म्हणून म्हणाल, तर दृष्टांत देऊन सांगतों. रस्त्यांत निखारा पडलेला असावा व त्यावर पाय पडावा, म्हणजे लागलाच पायास फोड येतो. अशा स्थळीं फोड व निखारा हे दोघे मात्र प्रत्यक्ष दिसत असतात. फोड येण्यास कारण होणारा अग्नींतील गुण प्रत्यक्ष दिसत नाहीं. पण फोड आल्यामुळें आपण त्यांचें अनुमान करितों. अर्थात् ती अग्निशक्ति निखारा व फोड यांहून निराळी आहे, हें उघड होय. सारांश, मायाशक्तीचीहि तीच स्थिति आहे, असें समजावें. ॥२९॥

-हाच न्याय मृत्तिकेच्या शक्तीमध्यें योजून दाखवितात -

पृथुबुध्नोदराकारो घट: कार्योऽत्र मृत्तिका ।
शब्दादिभि: पंचगुणैर्युक्ता शक्तिस्त्वतद्विधा ॥३०

अन्वयार्थ - [पृथुबुध्नोदराकार: घट: कार्य:-] ज्याचें पोट स्थूल व वर्तुल आहे असा घट कार्य आहे. [शब्दादिभि: पंचगुणै: युक्ता मृत्तिका अत्र आश्रय:-] व शब्दादि पांच गुणांनीं युक्त असलेली मृत्तिका हा आश्रय आहे. [शक्ति: तु अतद्विधा-] पण शक्ति तर दोहोंहून विलक्षण आहे.

प्रकाश:- अति स्थूल व वर्तुलाकार आहे उदर ज्याचें असा मृत्तिकेचा घट कुंभारानें दंडचक्रादि साधनांच्या योगानें तयार केला असतां कार्यरूप होतो. त्याचें कारण शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पांच गुणांनीं युक्त अशी माती असते. पण त्यास उत्पन्न करणारी मृत्तिकेमध्यें जी शक्ति असते, ती या कार्यकारणांहून अगदीं भिन्न होय. कारण, कार्य घट व कारण मृत्तिका जशी प्रत्यक्ष दिसते, त्याप्रमाणें ती प्रत्यक्ष दिसत नाहीं. तसेंच घटाचे स्थूलवर्तुलादि धर्म व मृत्तिकेचे शब्दादि गुण तिच्यामध्यें नसतात. ॥३०॥

- तिचें वैलक्षण्यच सांगतात -

न पृथ्वादिर्न शब्दादि: शक्तावस्तु यथा तथा ।
अत एव ह्यचिंत्यैषा न निर्वचनमर्हति ॥३१

अन्वयार्थ - [शक्तौ न पृथ्वादि च न शब्दादि: विद्यते-] शक्तीमध्यें स्थूलत्वादि कार्यधर्म नाहींत व शब्दादि आश्रयधर्महि नाहींत. [अत: यथा तथा अस्तु-] तस्मात् ती जशी तशी असो. [अत: एव हि एषा अचिन्त्या निर्वचनं न अर्हति-] एवढ्या करितांच ती अचिंत्य आहे. ती शब्दांनीं सांगतां येण्यासारखी नाहीं.

प्रकाश:- मृत्तिकेमध्यें घट उत्पन्न करण्याची जी शक्ति असते, तिच्यामध्यें मृत्तिकेचे धर्म नसतात व तसेच घटाचेहि धर्म नसतात. त्यामुळें ती कशी तरी असतें असेंच म्हणावें लागतें. म्हणजे ती अचिंत्य आहे. तिचें घटाप्रमाणें किंवा मृत्तिकेप्रमाणें वर्णन करतां येत नाहीं. कारण ती भिन्न आहे, अभिन्न आहे, किंवा अचिंत्यत्वादि धर्मयुक्त आहे, असें कधींच म्हणतां येत नाहीं. ॥३१॥

-'अहोपण, ती शक्ति कारणस्वरूपाहून जर भिन्न आहे, तर कारणस्वरूपाप्रमाणें भासत कां नाहीं ?' उत्तर-

कार्योत्पत्तेः पुरा शक्तिर्निगूढा मृद्यवस्थिता ।
कुलालादिसहायेन विकाराकारतां व्रजेत् ॥३२

अन्वयार्थ - [शक्तिः कार्यात्पत्तेः पुरा मृदिनिगूढा अवस्थिता-] मृत्तिकेंतील शक्ति घटादि कार्योत्पत्तीच्या पूर्वीं मृत्तिकेंमध्ये गुप्त राहते. 'मग गुप्त असलेली ती कधींच दिसणें शक्य नाहीं,' म्हणून म्हणाल तर दुधांत अव्यक्त असलेलें लोणी मंथन केल्यानें जसें व्यक्त होतें त्याप्रमाणें कुंभारादिकांच्या व्यापारानें ती व्यक्त होते, असें उत्तरार्धात सांगतात- [कुलालादिसहायेन विकाराकरतां व्रजेत्-] पुढें कुंभारादिकांच्या साहाय्यानें ती विकाररूपास प्राप्त होते.

प्रकाश:- घटरूपी कार्य उत्पन्न होण्याच्या पूर्वीं जी शक्ति मृत्तिकेमध्यें गुप्त असते, तीच कुंभार, दंड, व चक्र इत्यादिकांच्या साहाय्यानें कार्यरूपानें व्यक्त होते. अर्थात्- जी पूर्वीं अव्यक्त असते, ती नंतरहि अव्यक्तच असणें युक्त आहे - हें म्हणणें शोभत नाहीं. याविषयीं लोण्याचा दुसरा उत्तम दृष्टांत आहे. ताक करण्यापूर्वीं लोणी दह्यांमध्यें गुप्त असतें. पण तेंच पुढें घुसळल्यावर व्यक्त होतें. त्याप्रमाणेंच प्रस्तुत प्रकार समजावा. ॥३२॥

-'अहोपण, कारणातिरिक्त शक्तिकार्य जर आहे तर कार्य व कारण यांचा भेद भासत कां नाहीं ?' उत्तर -

पृथुत्वादिविकारांतं स्पर्शादिं चापि मृत्तिकाम् ।
एकीकृत्य घटं प्राहुर्विचारविकला जनाः ॥३३

अन्वयार्थ - [विचारविकलाः जनाः-] विचार-शून्य लोक [पृथुत्वादिविकारांतं च स्पर्शादि मृत्तिकां अपि एकीकृत्य घटं प्राहुः-] स्थूलादि - विकारान्त कार्य व शब्द-स्पर्शादिगुणरूप-कारणभूत मृत्तिका, यांस अविचारानें एक करून 'घट' असें म्हणतात.

प्रकाश:- ज्यांना कार्यकारणभाव समजत नाहीं, असे स्थूलबुद्धीचे सामान्य लोक स्थूल, वर्तुल इत्यादि विकार व शब्द, स्पर्श इत्यादिरूप मृत्तिका यांचें ऐक्य करून हा घट आहे असें म्हणूं लागतात. पण या व्यवहारास त्यांचा अविवेकच कारण आहे. ॥३३॥

-'पण हा घटव्यवहार अविचारमूलक कसा ?' उत्तर-

कुलालव्यापृतेः पूर्वो यावानंशः स नो घटः ।
पश्चात्तु पृथुबुध्नादिमत्त्वे युक्ता हि कुंभता ॥३४

अन्वयार्थ - [कुलालव्यापृतेः पूर्वः यावान् अंशः सः घटः नो-] कुंभाराच्या व्यापारापूर्वीं जो मृत्तिकेचा अंश असतो तो घट नव्हे. [पश्चात् तु पृथुबुध्नादिमत्त्वे कुंभता युक्ता हि-] पण कुंभाराच्या व्यापारानंतर त्याला स्थूलवर्तुलादि आकार प्राप्त झाला कीं कुंभता येणें युक्तच आहे.

प्रकाश:- कुंभार दंडादिकांच्या साहाय्यानें व्यापार करीपर्यंत जो मृत्तिकेचा ओला अंश असतो, त्याला घट असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. अर्थात् कुंभाराच्या क्रियेनंतर जो स्थूल, वर्तुल, पोकळ इत्यादि मृत्तिकेचा विकार होतो, त्यास 'घट' असें म्हणतां येणें शक्य आहे. जगाचा अनुभवहि तसाच आहे. ॥३४॥

-'अहोपण, खऱ्या घटाला अनिर्वचनीय शक्तीचें कार्य मानणें युक्त नव्हे' अशी शंका घेऊन 'घटहि खरा नाहीं' असें सांगतात -

स घटो न मृदो भिन्नो वियोगे सत्यनीक्षणात् ।

नाप्यभिन्नः पुरा पिंडदशायामनवेक्षणात् ॥३५

अन्वयार्थ - [वियोगे सति अनीक्षणात् सः घटः मृदः भिन्नः न अस्ति-] घटाला मृत्तिकेहून पृथक् करून पाहणें अशक्य असल्यामुळें मृद्वियोगानंतर त्याचा प्रत्यय येत नाहीं. त्यामुळें घट मृत्तिकेहून भिन्न नाहीं [पुरा पिंडदशायां अनवेक्षणात् अभिन्नः अपि न अस्ति-] उत्पत्तीच्या पूर्वी-पिंडकालीं त्याचा प्रत्यय येत नसल्यामुळें तो मृत्तिकाच म्ह० अभिन्नहि नाहीं.

प्रकाशः- घट मृत्तिकेहून भिन्न करून दाखविता येत नाहीं. त्यामुळें तो मृत्तिकेहून भिन्न आहे असें म्हणणे व्यर्थ आहे. तसाच तो मृत्तिकारूप आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण घट उत्पन्न होण्यापूर्वी जेव्हां नुस्ता मातीचा गोळाच असतो, तेव्हां त्याचा प्रत्यय येत नाहीं. तात्पर्य, घट मातीहून भिन्न किंवा अभिन्न आहे असें म्हणतां येत नाहीं. ॥३५॥

-घट सत्य आहे हें कशावरून सांगतां ? कारण -

अतोऽनिर्वचनीयोऽयं शक्तिवत्तेन शक्तिजः ।
अव्यक्तत्वे शक्तिरुक्ता व्यक्तत्वे घटनामभृत् ॥३६

अन्वयार्थ - [अतः शक्तिवत् अयं अनिर्वचनीयः-] यास्तव शक्तीप्रमाणें घटहि अनिर्वचनीयच आहे. [तेन शक्तिजः-] म्हणूनच तो शक्तीपासून उत्पन्न होणारा आहे. 'अहोपण, शक्ति व कार्य हीं दोन्ही जर अनिर्वचनीय तर एकाला शक्ति व दुसऱ्याला कार्य कां म्हणतात ?' उत्तर - [अव्यक्तत्वे शक्तिः उक्ता च व्यक्तत्वे घटनामभृत्-] घट जेव्हां अव्यक्त असतो तेव्हां त्याला शक्ति म्हणतात व तो जेव्हां व्यक्त होतो तेव्हा 'घट' असें नांव धारण करणारा होतो.

प्रकाशः- सारांश, शक्ति कारणाहून भिन्न किंवा अभिन्न आहे, यांतील कांहींच जसें म्हणता येत नाहीं, त्याचप्रमाणें घटाविषयींहि कांहीं निश्चय करितां येत नाहीं. यास्तव घट शक्तीपासून होणारा आहे. तो जेव्हा अव्यक्त असतो, तेव्हां शक्ति म्हणतात व जेव्हां व्यक्त होतो, तेव्हां त्यास घट हें नांव प्राप्त होतें. ॥३६॥

-लौकिक मायाहि अशीच आहे, असें आतां सांगतात -

ऐंद्रजालिकनिष्ठापि माया न व्यज्यते पुरा ।
पश्चाद्गंधर्वसेनादिरूपेण व्यक्तिमाप्नुयात् ॥३७

अन्वयार्थ - [ऐंद्रजालिकनिष्ठा अपि माया पुरा न व्यज्यते-] इंद्रजाल जाणणाऱ्या गारुड्यामध्यें असलेली मायाहि कार्यापूर्वीं व्यक्त नसते. [पश्चात् गंधर्वसेनादिरूपेण व्यक्तिं आप्नुयात्-] पुढें गंधर्वसेना इत्यादि रूपानें व्यक्त होते.

प्रकाशः- गारुडामध्यें असलेली माया ही गारुड सुरू होण्यापूर्वीं अव्यक्त असते, पण पुढें मणि, मंत्र, औषधि यांच्या योगानें तीच गुप्त असलेली माया गंधर्वसेना, गंधर्वनगर इत्यादि रूपानें व्यक्त होते. अर्थात् पूर्वीं अव्यक्त असून पुढें व्यक्त होणें हेंच माया व शक्ति यांचें लक्षण आहे. व तें सर्वत्र दिसण्यासारखें आहे. ॥३७॥

-आता घटादि शक्तिकार्यास मिथ्यात्व व शक्तीच्या आधारास सत्यत्व असतें, असें 'वाचारंभणं विकारो नामधेयं०' - छां. भा. ६. १.४- ही श्रुति सांगते, असें सांगतात -

एवं मायामयत्वेन विकारस्यानृतात्मताम् ।
विकाराधारमृद्वस्तुसत्यत्वं चाब्रवीच्छ्रुतिः ॥३८

अन्वयार्थ - [एवं मायामयत्वेन विकारस्य अनृतात्मतां च विकाराधारमृद्वस्तुसत्यत्वं श्रुतिः अब्रवीत्-]ह्याप्रमाणेंमायामयतेमुळें-मायाकार्यत्वामुळें घटादि-कार्यरूप विकाराला मिथ्यात्व व घटादि विकाराच्या आधारभूत मृत्तिकेला सत्यत्व आहे, असें श्रुतीनें सांगितलें आहे.

प्रकाश:- घटादि विकार मायामय असल्यामुळें म्हणजे तो मायेचें कार्य असल्यामुळें खोटा (कांहीं काल राहून पुन: आपल्या कारणांत लीन होणारा) आहे. आणि जिच्या आधारावर विकार होतो, ती मृत्तिका सत्य (म्हणजे विकारसमयीं, त्याच्या उत्पत्तिपूर्वी व नाशानंतरहि राहणारी) आहे, असें छान्दोग्याच्या सहाव्या अध्यायांत सांगितलें आहे. ॥३८॥

-आतां तें वाक्यच अर्थत: घेतात -

वाङ्निष्पाद्यं नाममात्रं विकारो नास्य सत्यता
स्पर्शादिगुणयुक्ता तु सत्या केवलमृत्तिका ॥३९

अन्वयार्थ - [विकार: वाङ्निष्पाद्यं नाममात्रं अस्य सत्यता न-] विकार, वाणीच्या योगानें निष्पन्न होणारा-नाममात्र असतो. त्याला सत्यता नसते. 'नाम' हेंच त्याचें स्वरूप आहे. त्याला नामतिरिक्त पारमार्थिक स्वरूप नाहीं. [स्पर्शादिगुणयुक्ता तु केवलमृत्तिका सत्या-] पण स्पर्शादिगुणयुक्त मृत्तिका मात्र सत्य असते.

प्रकाश:- घटादि विकार केवल शब्दमात्र असतात. म्हणजे त्यांच्याविषयीं शब्दव्यवहार मात्र करितां येतो. त्याच्या पलिकडे कांहीं नाहीं. कारण केवळ नांवाच्या पलीकडे त्याला स्वरूपच नाहीं. पण स्पर्शादि अनेक गुणांनीं युक्त असलेली मृत्तिका विकाराचें कारण असल्यामुळें सत्य आहे. म्हणजे तिला नांवाच्या पलीकडे कांहीं स्वरूप आहे. ॥३९॥

-आता शक्ति व तिचें कार्य यांना मिथ्यात्व व त्यांच्या आधाराला सत्यत्व कां तें सांगतात -

व्यक्ताव्यक्ते तदाधार इति त्रिष्वाद्ययोर्द्वयो: ।
पर्याय: कालभेदेन तृतीयस्त्वनुगच्छति ॥४०

अन्वयार्थ - [व्यक्ताव्यक्ते तदाधार: इति त्रिषु आद्ययो: द्वयो: कालभेदेन पर्याय:-] घटादिरूप कार्य हें व्यक्त, तत्कारणभूत शक्ति हें अव्यक्त व त्या दोहोंची आधारभूत मृत्तिका अशा या तीन पदार्थांतील कार्य व शक्ति यांचे काल भिन्न असल्यामुळें त्यांचें अस्तित्व एकाच वेळीं संभवत नाहीं. तर तीं दोन्ही क्रमानें राहतात. [तृतीय: तु उभयत्र अनुगच्छति-] पण त्या दोहोंचा आधार अशी जी मृत्तिका वगैरे ती त्या दोहोंमध्यें अनुवृत्त होते.

प्रकाश:- विकाराच्या व्यक्त व अव्यक्त अशा दोन अवस्था आहेत. यांतील व्यक्त अवस्थेस कार्य व अव्यक्त अवस्थेस शक्ति म्हणतात. पण त्या परस्पर विरुद्ध असल्यामुळें एकाच कालीं राहू शकत नाहींत. अर्थात् जेव्हां शक्ति असते, तेव्हां कार्य नसतें व कार्य असतें तेव्हां शक्ति नसते. पण आधारभूत मृत्तिकेची अशी स्थिति नाहीं. कारण ती शक्तिसमयीं व कार्यसमयींहि असते. यास्तव ती सत्य व कांहीं काल राहणारी शक्ति व कार्य हीं अनित्य होत. ॥४०॥

-आतां विकार अनित्य आहे, याविषयीं तीन हेतु सांगतात -

निस्तत्त्वं भासमानं च व्यक्तमुत्पत्तिनाशभाक् ।
तदुत्पत्तौ तस्य नाम वाचा निष्पाद्यते नृभि: ॥४१

अन्वयार्थ:- [व्यक्तं निस्तत्त्वं च भासमानं-] 'व्यक्त' या नांवाचें घटादिकार्य तत्त्वशून्य आहे. तें स्वरूपानें असत् असतांनाच भासतें. [तथा उत्पत्तिनाशभाक्-] तसेंच तें उत्पत्ति-विनाशयुक्त असल्याचें दिसतें. [तथा च तदुत्पतौ नृभि: तस्य नाम वाचा निष्पाद्यते-] व त्याच्या उत्पत्तीनंतर मनुष्यांकडून त्याचा 'वाक्' इंद्रियजन्य नाममात्रानें व्यवहार केला जातो.

प्रकाश:- व्यक्त असें ज्याला म्हणतात तें कार्य स्वरूपत: असत् असूनहि उत्तम प्रकारें प्रतीत होतें; हें एक कारण, तसेंच तें उत्पत्ति व नाश यांनीं युक्त असतें हें दुसरें; आणि उत्पत्तीनंतरच त्याचा वाणीच्या योगानें व्यवहार करितां येतो, हें तिसरें कारण होय. या तीन कारणावरून विकार अनित्य आहे, असा निश्चय करितां येतो. कारण जें जें असत् असून भासणारें मृगजलादि

तें तें अनित्य, जें जें उत्पत्तिविनाशयुक्त तें तें अनित्य, व जें जें इंद्रियगम्य तें तें अनित्य, असा नियम आहे. ॥४१॥

-शिवाय-

व्यक्ते नष्टेऽपि नामैतन्नृवक्त्रेष्वनुवर्तते ।
तेन नाम्ना निरूप्यत्वाद्व्यक्तं तद्रूपमुच्यते ॥४२

अन्वयार्थ - [व्यक्ते नष्टे अपि एतत् नाम नृवक्त्रेषु अनुवर्तते-] व्यक्त जरी नष्ट झालें तरी त्यांचें नांव मनुष्यांच्या तोंडांत असतें. [तेन नाम्ना निरूप्यत्वात् व्यक्तं तद्रूपं उच्यते-] यास्तव नामानें निरूपण करितां येण्यासारखें असल्यामुळें व्यक्त नामरूप आहे, असें म्हटलें जातें.

प्रकाश:- कार्याचें स्वरूप जरी नष्ट झालें, तरी त्याच्याहून भिन्न नसणारें त्यांचें नांव मनुष्यांच्या तोंडांत राहतेंच. शिवाय कार्य त्याच्या नांवानेंच निरूपण करितां येण्यासारखें असल्यामुळें व त्याच्या निरूपणास दुसरा उपायच नसल्यामुळें नामरूपच कार्य असतें असें म्हणतात. वेदांतशास्त्रांत नामरूपात्मक जगत् असें जें म्हटलेलें आढळतें, त्याचें कारण हेंच होय. ॥४२॥

-असो, ह्याप्रमाणें तीन हेतूंची सिद्धि करून त्याविषयीं अनुमान कसें करावें तें दाखवितात -

निस्तत्त्वत्वाद्विनाशित्वाद्वाचारंभणनामतः ।
व्यक्तस्य न तु तद्रूपं सत्यं किंचिन्मृदादिवत् ॥४३

अन्वयार्थ - [व्यक्तस्य यत् रूपं अस्ति तत् किंचित् सत्यं न -] घटादिरूप कार्याचें जें रूप आहे तें कांहींच सत्य नाहीं. [निस्तत्त्वत्वात् विनाशित्वात् च वाचारंभणनामतः-] कारण तें निस्तत्त्व-वास्तवरूपरहित, विनाशशील व वागिंद्रियजन्य शब्दमात्ररूप असतें. या तिन्ही हेतूंना वैधर्म्य दृष्टान्त- [तु मृदादिवत्-] मृदादिकांप्रमाणें.

प्रकाश:- घटादि कार्याचें जें स्थूल व वर्तुल उदर, संकुचित मान इत्यादि स्वरूप दिसतें तें सत्य नव्हे. कारण तें तत्त्वशून्य म्हणजे वास्तविक स्वरूपशून्य असतें; विनाशी असतें; व वागिंद्रियजन्य शब्दमात्र असतें. याविषयीं मृत्तिकेचा व्यतिरेकी दृष्टान्त आहे. म्हणजे मृत्तिका घटाच्या अपेक्षेनें तत्त्वरूप असल्यामुळें, घटासारखी विनाशी नसल्यामुळें व घटाप्रमाणें केवल शब्दरूप नसल्यामुळें नित्य आहे. ॥४३॥

-याप्रमाणें विकाराच्या असत्यत्वाचें उपपादन करून तदधिष्ठानरूप मृत्तिकेच्या सत्यत्वाचें उपपादन करितात -

व्यक्तकाले ततः पूर्वमूर्ध्वमप्येकरूपभाक् ।
सतत्त्वमविनाशं च सत्यं मृद्वस्तु कथ्यंते ॥४४

अन्वयार्थ - [व्यक्तकाले ततः पूर्वं ऊर्ध्वं अपि-] कार्याच्या स्थितिकालीं, त्याच्या उत्पत्तीपूर्वी व नाशांनतरहि [एकरूपभाक्, सतत्त्वं च अविनाशं मृद्वस्तु सत्यं कथ्यते-] एकरूपानें असणारी, वास्तविक रूपानें राहणारी व अविनाशी अशी मृत्तिकासंज्ञक वस्तु सत्य आहे, असें सांगितलें जातें.

प्रकाश:- व्यक्तकाले - कार्याच्या उत्पत्तीनंतर व नाशापूर्वी जो काल जातो त्यास व्यक्त किंवा स्थितिकाल म्हणतात. सतत्त्व:- तत्त्व ह्मणजे वास्तविक रूप. जें त्रिकालीं बदलत नाहीं त्यास वास्तविक म्हणतात ॥४४॥

-'घटादि कार्यसमूह असत्य आहे असेंच जर मानलें, तर शुक्तिरजतादि इतर असत्य कार्यांप्रमाणें अधिष्ठानज्ञानानें त्याचाहि बाध व्हावयास पाहिजे' अशी शंका -

व्यक्तं घटो विकारश्चेत्येतैर्नामभिरीरितः ।
अर्थश्चेदनृतः कस्मान्न मृद्बोधे निवर्तते ॥४५॥

अन्वयार्थ - [व्यक्तं, घट: च विकार: इति एतै: नामभि: ईरित: अर्थ: अनृत: चेत्-] व्यक्त, घट व

विकार अशा या नांवांनीं बोलला जाणारा पदार्थ जर मिथ्या आहे, तर [मृद्बोधे कस्मात् न निवर्तते-] मृत्तिकेचें ज्ञान झालें असतां त्याची निवृत्ति कां होत नाहीं ?

प्रकाश:- शक्तीवर भासणाऱ्या रुप्याची शुक्तिज्ञानानें जशी निवृत्ति होते, तशीच मृत्तिकेवर भासणाऱ्या मिथ्या घटाचीहि मातीचा साक्षात्कार झाला असतां निवृत्ति व्हावयास पाहिजे असें वाद्याचें म्हणणें आहे. ॥४५॥

- समाधान -

निवृत्त एव यस्मात्ते सत्सत्यत्वमतिर्गता ।
ईदृङ्निवृत्तिरेवात्र बोधजा न त्वभासनम् ॥४६

अन्वयार्थ - [यस्मात् ते तत्सत्यत्वमति: गता तस्मात् स: निवृत्त: एव-] ज्या अर्थी तुझी त्याच्या सत्यत्वाविषयींची बुद्धि गेली, त्या अर्थी तो निवृत्त झालाच. 'अहो पण, अधिष्ठानज्ञानानें आरोपित रजतादिरूपाचीच अप्रतीति होते, नुसती सत्यत्वबुद्धिच निवृत्त होत नाहीं' अशी आशंका घेऊन 'शुक्तीवर रजतभ्रम होणें हा निरुपाधिक भ्रम असल्यामुळें तसें होतें, पण सोपाधिक भ्रमांत सत्यत्वबुद्धि निवृत्त होणें हाच बाध आहे,' अशा आशयानें सांगतात - [अत्र ईदृक् एव बोधजा निवृत्ति: न तु अभासनम्-] असल्या सोपाधिक भ्रमांमध्यें अशीच बोधजन्य निवृत्ति होत असते, आरोपित पदार्थाची प्रतीतिच न येणें या स्वरूपाची निवृत्ति होत नाहीं.

-'असा अनुभव कोठें येतो ?' उत्तर -

पुमानधोमुखो नीरे भातोऽप्यस्ति न वस्तुत: ।
तटस्थमर्त्यवत्तस्मिनैवास्था कस्यचित्क्वचित् ॥४७

अन्वयार्थ - [नीरे अधोमुख: भात: अपि पुमान् वस्तुत: न अस्ति-] जलामध्यें खालीं तोंड व वर पाय असा अधोमुख भासणाराहि पुरुष वस्तुत: नसतो. याविषयीं उपपत्ति - [तटस्थमर्त्यवत् तस्मिन् एव कस्यचित् क्वचित् आस्था न अस्ति -] कारण तीरावर उभ्या असलेल्या मनुष्याप्रमाणें त्या जलांतील अधोमुख मनुष्याच्या ठिकाणीं कोणाची कधींच आस्था- सत्यत्वाभिमान आढळत नाहीं.

प्रकाश:- नदी, तळें, विहीर इत्यादि जलाशयांच्या कांठीं उभें राहून पाण्यांत पाहिल्यास आपलेंच शरीर त्यांत उलटें दिसतें. म्हणजे डोकें खालीं व पाय वर अशी आकृति नजरेस पडते. पण तिला पाहून कोणी तरी (विवेकी अथवा अविवेकी) त्या उलट्या छायेच्या ठायीं तीरस्थ पुरुषाप्रमाणें कधीं तरी सत्यत्वाभिमान धरितो का ? मुळींच नाहीं. ॥४७॥

-'अहोपण, आरोपित पदार्थ असत्य आहे, एवढ्याच ज्ञानानें पुरुषार्थाची सिद्धि होत नाहीं' अशी शंका घेऊन सांगतात -

ईदृग्बोधे पुमर्थत्वं मतमद्वैतवादिनाम् ।
मृद्रूपस्यापरित्यागाद्विवर्तत्वं घटे स्थितम् ॥४८

अन्वयार्थ - [अद्वैतवादिनां ईदृग्बोधे पुमर्थत्वं मतम्-] अद्वैतवादी लोकांस अशा प्रकारचा बोध झाला असतांच पुरुषार्थत्व संमत आहे म्ह० 'अद्वैतवादामध्यें आत्मानंदाहून भिन्न अशा सर्व सृष्टीला मिथ्यात्व आहे,' असा निश्चय झाला असतां 'अद्वैतानंदाची अभिव्यक्ति' हा पुरुषार्थ सिद्ध होतो. पण घट मृत्तिकेचा विवर्त आहे हें कशावरून ? उत्तर - [मृद्रूपस्य अपरित्यागात् घटे विवर्तत्वं स्थितम्-] मृत्तिकेचें स्वरूप न सोडतां घटाचें भान होत असल्यामुळें घट मृत्तिकेचा विवर्त आहे, हें सिद्ध होतें.

प्रकाश:- 'अद्वैतवादामध्यें आत्मानंदाहून भिन्न अशा सर्व सृष्टीस मिथ्यात्व आहे, असा निश्चय झाला असतां अद्वैतानंदाची अभिव्यक्ति हा पुरुषार्थ सिद्ध होतो.' असा पूर्वार्धाचा सारांश समजावा. पण घट मृत्तिकेचा विवर्त हें कशावरून ? असें म्हणाल तर

सांगतों. - मृत्तिकेचें स्वरूप न सोडतां घटाचें भान होत असल्यामुळें घट मृत्तिकेचा विवर्त आहे. कारणाचें स्वरूप न बदलतां कार्याचें भलतेंच भान होणें हाच विवर्त होय. ॥४८॥

-'पण घटांतील मृद्रूपाचा त्याग जरी होत नसला तरी घट मृत्तिकेचा परिणाम आहे असें कां म्हणूं नये ?' उत्तर -

परिणामि पूर्वरूपं त्यजेत्तत्क्षीररूपवत् ।
मृत्सुवर्णे निवर्तेते घटकुंडलयोर्न हि ॥४९

अन्वयार्थ - [क्षीररूपवत् परिणामे तत् पूर्वरूपं त्यजेत्-] दुधाच्या स्वरूपाप्रमाणें परिणामामध्ये कारण आपलें पूर्वरूप टाकितें. [घटकुंडलयो: मृत्सुवर्णे न निवर्तेते हि-] पण घट व कुंडल यांच्यातील मृत्तिका व सुवर्ण निवृत्त होत नाहींत, हें प्रसिद्ध आहे.

प्रकाश:- दुधाचें दहीं होणें हा परिणाम आहे. व त्यांत मूळरूप नष्ट होत असतें, असा अनुभव आहे. पण विवर्ताची तशी स्थिति नसल्यामुळें मातीचा घट व सुवर्णाचें कुंडल यांतील, दह्यांतील दुधाप्रमाणें माती व सुवर्ण हीं निवृत्त होत नाहींत. तर कारणभूत मृत्तिका व सुवर्ण यांचें कार्यकालींहि अस्तित्व व भान असतें. ॥४९॥

-पण घटाला मातीचा विवर्त मानणें अयोग्य आहे. कारण घटाचा नाश झाल्यावर तो मृत्तिकारूप झालेला दिसत नाहीं,' अशी शंका व तिचा परिहार-

घटे भग्ने व मृद्भाव: कपालानामवेक्षणात् ।
मैवं चूर्णेऽस्ति मृद्रूपं स्वर्णरूपं त्वतिस्फुटम् ॥५०

अन्वयार्थ - [घटे भग्ने कपालानां अवेक्षणात् मृद्भाव: न इति मा एवं-] घट फुटल्यावर खापऱ्या दिसत असल्यामुळें त्याचा मृद्भाव होत नाहीं असें म्हणूं नको. [यत: चूर्णे मृद्रूपं अस्ति-] कारण त्यांच्या चूर्णामध्यें मृद्रूप असतेंच. [स्वर्णरूपं तु अति स्फुटं वर्तते-] कुंडलांतील सुवर्णाचें रूप तर अति स्पष्ट असतें.

प्रकाश:- मातीची घागर फोडून टाकिल्यावर तिच्या खापऱ्या होतात; माती होत असल्याचें कोणाच्याहि पाहण्यांत नाहीं. तेव्हां माती हें घटाचें उपादान कारण आहे, व त्याचा घटाच्या अस्तित्वसमयींहि प्रत्यय येत असल्यामुळें घट हा त्याचा विवर्त आहे, असें कसें म्हणतां येईल ? असें जर म्हणशील तर तें तुझें म्हणणें बरोबर नाहीं. कारण खापऱ्यासुद्धां मृत्तिकेचाच विकार आहे. व त्यांचा कुटून चूर केला असतां मातीच होते. कुंडलांतील सुवर्ण तर अगदीं स्पष्टच आहे. सारांश घट, कुंडल इत्यादि कार्ये विवर्त होत. ॥५०॥

-'परिणामवादांत दृष्टान्तरूपानें सांगितलेल्या दूध, मृत्तिका व सुवर्ण इत्यादिकांतील मृत्तिका व सुवर्ण यांचें विवर्तदृष्टान्तत्व जर मानलें तर तसेंच दुधाचेंहि विवर्तदृष्टान्तत्व कां मानूं नये,' अशी आशंका घेऊन सांगतात -

क्षीरादौ परिणामोऽस्तु पुनस्तद्भाववर्जनात् ।
एतावता मृदादीनां दृष्टान्तत्वं न हीयते ॥५१

अन्वयार्थ - [पुन: तद्भाववर्जनात् क्षीरादौ परिणाम: अस्तु-] एकदा दुधाचें दहीं झालें कीं पुनरपि त्याला दुग्धभाव प्राप्त होत नसल्यामुळें क्षीरादिकांच्या ठिकाणीं परिणाम असो; [एतावता मृदादीनां दृष्टान्तत्वं न हीयते-] पण एवढ्यावरून मृत्तिकादिकांचें विवर्तदृष्टांतत्व नष्ट होत नाहीं.

प्रकाश:- दुधाचें एकदा दहीं झालें कीं फिरून त्याचें दूध करिता येत नाहीं यास्तव त्यास परिणामच म्हणावें. आणि मातीचा घट व सुवर्णाचें कुंडल झालें असता माती व सुवर्ण याचेंहि अवस्थांतर होत असल्यामुळें त्यास परिणामहि म्हणावें व पूर्वरूपाचा परित्याग होत नसल्यामुळें विवर्तहि म्हणावें. सारांश, विवर्तवादामध्यें सुवर्णादिकहि दृष्टान्त होऊं शकतात. ॥५१॥

-'तर मग तसेंच मृत्तिका व सुवर्ण यांचें आरंभकत्वहि कां स्वीकारूं नये ?' उत्तर -

आरंभवादिन: कार्ये मृदो द्वैगुण्यमापतेत् ।
रूपस्पर्शादय: प्रोक्ता: कार्यकारणयो: पृथक् ॥५२

अन्वयार्थ - [आरंभवादिन: कार्ये मृद: द्वैगुण्यं आपतेत्-] आरंभवाद्यांच्या मतानें घटादि कार्यामध्यें द्विगुणत्व प्राप्त होईल. अर्थात् त्याचें वजन वगैरे दुप्पट होईल. 'तें कां ?' उत्तर [रूपस्पर्शादय: कार्यकारणयो: पृथक् प्रोक्ता:-] कारण त्यांनीं रूपस्पर्शादिक गुण कार्य व कारण यांमध्यें पृथक् मानलेले आहेत.

प्रकाश:- वैशेषिक आरंभवादी आहेत. त्यांच्या मतानें-घट, कुंडल इत्यादि कार्यांमध्यें मृत्तिकादि द्रव्य कार्यरूपानें व कारणरूपानें असें दुप्पट होतें-असें ठरतें. पण तसें झालें असतां गुरुत्वादि सर्वच गुण दुप्पट झालेच पाहिजेत, असा नियम कसा करितां येईल ? म्हणून म्हणाल तर सांगतों:- आरंभवादी कार्यांतील रूपादि गुण कारणांतील रूपादि गुणांहून भिन्न असतात असें म्हणतात, त्यामुळें आम्ही म्हणतों तसा प्रकार अवश्य होणारच. व जर होत नसला, तर आरंभवाद युक्तिशून्य आहे, असें म्हणावयास पाहिजे. ॥५२॥

-'पण मृत्तिका व सुवर्ण या दोहोंनाच का विवर्तदृष्टान्तत्व आहे ?' 'नाहीं' असें उत्तर -

मृत्सुवर्णमयश्चेति दृष्टान्तत्रयमारुणि: ।
प्राहातो वासयेत्कार्यानृतत्वं सर्ववस्तुषु ॥५३

अन्वयार्थ - [मृत्, सुवर्ण, च अय: इति दृष्टान्तत्रयं आरुणि: प्राह-] मृत्तिका, सुवर्ण व लोखंड असे तीन दृष्टान्त अरुणपुत्रानें दिले आहेत. [अत: सर्ववस्तुषु कार्यानृतत्वं वासयेत्-] यास्तव सर्व वस्तूंच्या ठिकाणीं कार्याचें मिथ्यात्व निश्चित करावें. - छां. भा. अ. ६.१.

प्रकाश:- अरुणाचा पुत्र जो उद्दालक मुनि त्यानें आपल्या पुत्रास उपदेश करीत असतां मृत्तिका, सुवर्ण व पोलाद यांचे दृष्टांत दिले व त्यावरून घट, कुंडल, सुरी इत्यादि कार्यरूप पदार्थ अनित्य व माती, सुवर्ण, पोलाद इत्यादि कारणरूप पदार्थ नित्य असें ठरविलें. असे अनेक दृष्टांत देण्याचें कारण एवढेंच कीं सुज्ञ साधकानें सर्व भूतभौतिक कार्यांचें ठायीं मिथ्या दृष्टि करावी ॥५३॥

-'पण कार्य मिथ्या आहे, असें अनुसंधान तरी काय म्हणून करावयाचें ?' 'कारणज्ञानानें कार्यज्ञान सिद्ध होण्यासाठीं' असें उत्तर --

कारणज्ञानत: कार्यविज्ञानं चापि सोऽवदत् ।
सत्यज्ञानेऽनृतज्ञानं कथमत्रोपपद्यते ॥५४

अन्वयार्थ - [स: कारणज्ञानत: कार्यविज्ञानं अपि अवदत्-] तो अरुणपुत्र कारणज्ञानानें कार्यज्ञान होतें, असेंहि सांगता झाला. शंका- [अत्र सत्यज्ञाने अनृतज्ञानं कथं उपपद्यते-] पण सत्याचें ज्ञान झाल्यानें असत्याचें ज्ञान होणें, कसें युक्त आहे ?

प्रकाश:- मृत्तिका, सुवर्ण इत्यादि कारणांचें ज्ञान झालें असतां घटकुंडलादि कार्यांचेंहि पूर्ण ज्ञान होतें, असें आरुणीनें स्पष्टपणें सांगितलें आहे. शंका:- पण; परमार्थत: सत्य अशा कारणाच्या ज्ञानानें त्याच्याहून अगदीं विलक्षण अशा कार्याचें ज्ञान कसें होऊं शकेल ? ॥५४॥

-समाधान-

समृत्कस्य विकारस्य कार्यता लोकदृष्टित: ।
वास्तवोऽत्र मृदंशोऽस्य बोध: कारणबोधत: ॥५५

अन्वयार्थ - [समृत्कस्य विकारस्य कार्यता लोकदृष्टित:-] अधिष्ठानभूत मृत्तिकेसह असणाऱ्या विकारानें कार्यत्व म्ह० मृत्तिकेसह घट हा कार्य शब्दाचा अर्थ आहे, हें लोकप्रसिद्ध आहे. [अत्र वास्तव: मृदंश: अस्ति-] या कार्यामध्यें जो खरा

मृत्तिकेचा अंश आहे, [अस्य बोध: कारणबोधत: भवति-] त्याचें ज्ञान कारणज्ञानावरून होतें.

प्रकाश:- अधिष्ठानभूत मृत्तिकेसह घटादिरूप आरोपित विकारास कार्यत्व असतें म्हणजे त्यास कार्य असें म्हणतात, हें आबालवृद्धांस ठाऊक आहे. कार्यामध्यें एक सत्य व दुसरा असत्य असे दोन अंश असतात. यास्तव; कारणाचें ज्ञान झालें कीं, कार्यांतील सत्य अंशाचें ज्ञान होतेंच. मग त्यांतील मिथ्या अंशाचें ज्ञान जरी न झालें तरी सत्य ज्ञानास बाध येत नाहीं. ॥५५॥

-'कार्यातील सत्यांश जाणणें जसें अवश्य आहे, तसेंच मिथ्यात्व जाणणेंहि अवश्य आहे !' अशी शंका घेऊन 'त्या ज्ञानाचें कांहीं प्रयोजन नसल्यामुळें त्याची आवश्यकता नाहीं,' असें सांगतात -

अनृतांशो न बोद्धव्यस्तद्बोधानुपयोगत: ।
तत्त्वज्ञानं पुमर्थं स्यान्नानृतांशावबोधनम् ॥५६

अन्वयार्थ - [तद्बोधानुपयोगत: अनृतांश: न बोद्धव्य:-] मिथ्यांशाच्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नसल्यामुळें त्याचें ज्ञान अवश्य नाहीं. [तत्त्वज्ञानं पुमर्थं स्यात् न अनृतांशावबोधनम्-] कारण तत्त्वज्ञान जसें पुरुषार्थोपयोगी असतें, तसें मिथ्यांशाचें ज्ञान असत नाहीं.

प्रकाश:- कार्यांतील मिथ्या अंशाचा जर कांहीं उपयोग असता, तर शास्त्रानें त्याच्या ज्ञानाविषयीं विधान केलें असतें. पण त्याचा पुरुषांस कांहीं उपयोग नाहीं. कारण मोक्षनामक पुरुषार्थ तत्त्वज्ञानानेंच मिळत असतो, असा सर्व शास्त्रांचा सिद्धांत आहे. ॥५६॥

-याविषयीं पुनरपि शंका --

तर्हि कारणविज्ञानात्कार्यज्ञानमितीरिते ।
मृद्बोधान्मृत्तिका बुद्धेत्युक्तं स्यात्कोऽत्र विस्मय: ॥५७

अन्वयार्थ - [तर्हि कारणविज्ञानात् कार्यज्ञानं इति ईरिते-] तर मग मृदादिकारणाच्या यथार्थ ज्ञानानें कार्यांतील मृदादि सत्यांशाचें ज्ञान होतें, असें सांगितलें असतां [मृद्बोधात् मृत्तिका बुद्धा इति उक्तं स्यात्-] मृत्तिकेच्या ज्ञानानें मृत्तिकेचें ज्ञान होतें, असेंच म्हटल्यासारखें होणार ! [अत्र क: विस्मय:-] अर्थात् अशा वाक्यापासून शब्दत:च चमत्कार वाटतो, अर्थत: कांहीं चमत्कार नाहीं !

प्रकाश:- कारणज्ञानानें कार्यज्ञान होतें. या वाक्याचा अर्थ-मातीच्या ज्ञानानें मातीचें ज्ञान होतें - असा आहे. पण यामध्यें चमत्कार काय आहे, तें आम्हांस समजलें नाहीं. कारण मातीच्या ज्ञानानें मातीचें ज्ञान होतें, असें जर कोणी सामान्य मनुष्यानें म्हटलें, तर भाषाभिज्ञ त्यांस हंसतील, यांत मुळींच संदेश नाहीं. ॥५७॥

-अशा विवेकसंपन्न लोकांना जरी कांहीं चमत्कार वाटला नाहीं तर विवेकशून्यांना चमत्कार वाटतोच, अशा आशयानें वरील शंकेचा परिहार -

सत्यं कार्येषु वस्त्वंश: कारणात्मेति जानत: ।
विस्मयो मास्त्विहाज्ञस्य विस्मय: केन वार्यते ॥५८

अन्वयार्थ -[सत्यं, कार्येषु, वस्त्वंश: कारणात्मा इति जानत: विस्मय: मा अस्तु-] खरें आहे. घटादि कार्यांमध्यें असलेला सत्य अंश कारणरूपच आहे, असें जाणणाऱ्यास विस्मय न वाटो, [किं तु इह अज्ञस्य विस्मय: केन वार्यते-] पण याविषयीं अज्ञाला वाटणाऱ्या विस्मयाचें निवारण कोणाकडून केलें जाणार !

प्रकाश:- जें विवेकी आहेत, त्यांना याविषयीं आश्चर्य वाटणार नाहीं हें खरें, पण दुसरे जे पुष्कळसे अज्ञानी आहेत, त्यांना 'कारणज्ञानानें कार्यज्ञान होतें' हें वाक्य आश्चर्यचकित करील, यांत कांहीं शंका नाहीं. कारण घटादि कार्यांतील वास्तविक अंश उपादान कारणाचाच आहे. असें ऐकून 'असें कसें होईल ?' कारण निराळें व कर्म निराळें; त्यांचें अंशत: ऐक्य कसें होऊं शकेल ? इत्यादि प्रकारें त्यांना आश्चर्य वाटणें

साहिजकच आहे. ॥५८॥

-आतां अविवेक्यांस कार्य-कारणांचें ऐक्य ऐकून आश्चर्य कसें वाटतें, तें सांगतात -

आरंभी परिणामी च लौकिकश्चैककारणे ।
ज्ञाते सर्वमतिं श्रुत्वा प्राप्नुवंत्येव विस्मयम् ॥५९

अन्वयार्थ - [आरंभी, परिणामी च लौकिक:-] आरंभवादी, परिणामवादी व लौकिक [एककारणे ज्ञाते सर्वमतिं श्रुत्वा विस्मयं प्राप्नुवन्ति एव-] **एका कारणाचें ज्ञान झालें असतां अनेक कार्याचें ज्ञान होतें, असें ऐकून विस्मयास प्राप्त होतातच.**

प्रकाश:- आरंभ म्हणजे समवायी, असमवायी, व निमित्त या तीन कारणांहून भिन्न अशा कार्यांची उत्पत्ति. अशी उत्पत्ति जो सांगतो म्हणजे अशा प्रकारेंच कार्याची उत्पत्ति झाली आहे असें जो मानतो व लोकांस सांगतो, त्यास आरंभवादी ह्मणतात. सहा शास्त्रांतील न्याय व वैशेषिक शास्त्रें आरंभवादी आहेत. परिणाम म्हणजे पूर्वरूप टाकून दुसऱ्या रूपाची प्राप्ति होणें. अशा परिणामाचें जो प्रतिपादन करितो, म्हणजे कार्य, कारणाचा परिणाम आहे असें जो मानतो व लोकांस सांगतो, त्यास परिणामवादी ह्मणतात. सहा शास्त्रांतील योगशास्त्र व सांख्यशास्त्र हीं परिणामवादी आहेत. पण ही दोन्ही प्रकारची शास्त्रीय प्रक्रिया ज्यांस ठाऊक नसते व जे केवल व्यवहारचतुर असतात त्यांस लौकिक म्हणतात. या त्रिवर्गांनाहि एका कारणाच्या ज्ञानानें सर्व कार्यजाताचें ज्ञान होतें, असें कोणी सांगितल्यास मोठें आश्चर्य वाटतें ! ॥५९॥

-पण यथाश्रुत अर्थ सोडून असें क्लिष्ट व्याख्यान करण्याचें काय प्रयोजन ?' उत्तर -

अद्वैतेऽभिमुखीकर्तुमेवात्रैकस्य बोधत: ।
सर्वबोध: श्रुतौ नैव नानात्वस्य विवक्षया ॥६०

अन्वयार्थ - [अद्वैते अभिमुखीकर्तुं एव अत्र श्रुतौ एकस्य बोधत: सर्वबोध: उक्त:-] शिष्याला **अद्वैताभिमुख करण्याकरितांच छान्दोग्य श्रुतीमध्यें एका कारणाच्या ज्ञानानें सर्व कार्यांचें ज्ञान सांगितलेलें आहे.** [नानात्वस्य विवक्षया न एव-] **कार्यांचें अनेकत्व आहे, असें सांगण्याच्या इच्छेनें नव्हे.**

प्रकाश:- शिष्यास अद्वैतशास्त्रांत प्रवृत्त करण्याकरितांच छान्दोग्य श्रुतीमध्यें एका कारणाचें ज्ञान झाल्यानें सर्व कार्यांचें ज्ञान होतें असें सांगितलें आहे. अनेक कार्यांचें ज्ञान झालें पाहिजे, असें श्रुतीनें कोठेंहि सांगितलेलें नाहीं. सारांश, श्रुतीचें तात्पर्य अद्वैतामध्यें आहे, द्वैतांत नव्हे. ॥६०॥

- सारांश -

एकमृत्पिंडविज्ञानात्सर्वमृन्मयधीर्यथा ।
तथैकब्रह्मबोधेन जगद्बुद्धि: विभाव्यताम् ॥६१

अन्वयार्थ - [यथा एकमृत्पिंडविज्ञानात् सर्वमृन्मयधी: भवति-] **जसें एका मृत्तिकेच्या पिंडाचें ज्ञान झालें असतां सर्व मृन्मय कार्याचें ज्ञान होतें,** [तथा एकब्रह्मबोधेन जगद्बुद्धि: विभाव्यताम्-] **त्याप्रमाणें एका ब्रह्मज्ञानानें सर्व जगाचें ज्ञान होतें, असें समजावें.**

प्रकाश:- "मातीचीं सर्वहि भांडीं, कवलें, परळें, इत्यादि सर्व पदार्थ मातीच्या गोळ्यांचाच विकार असल्यामुळें मातीचें ज्ञान झालें असतां सर्व मृत्कार्याचें ज्ञान होतें." या श्रुतीनें सांगितलेल्या दृष्टांताप्रमाणेंच एका ब्रह्माचें ज्ञान झालें की त्याच्या कार्यरूप अशा या सर्व जगाचेंहि ज्ञान होतें, असें समजावें. कारण ब्रह्म प्रकृतिद्वारा जगाचें उपादान कारण आहे, हें पूर्वीं ठरलेलें आहे. ॥६१॥

-आतां ब्रह्म व जगत् यांचें स्वरूप सांगतात -

सच्चित्सुखात्मकं ब्रह्म नामरूपात्मकं जगत् ।
तापनीये श्रुतं ब्रह्म सच्चिदानंदलक्षणम् ॥६२

अन्वयार्थ - [ब्रह्म सच्चित्सुखात्मकं च जगत् नामरूपात्मकं अस्ति-] ब्रह्म सत्, चित् व आनन्दरूप आणि जगत् नामरूपात्मक आहे.

[तापनीये ब्रह्म सच्चिदानंदलक्षणं श्रुतं अस्ति-] उत्तरतापनीय नामक उपनिषदांत ब्रह्म सत्, चित् व आनंदरूप सांगितलें आहे.

प्रकाश:- नाम व रूप (आकार) यांच्या पलीकडे जगत् म्हणून कांहीं नाहींच. ब्रह्म तर त्रिकालाबाधित, चैतन्यरूप व आनंदरूप आहे. ब्रह्माचें हें स्वरूपलक्षण अथर्ववेदाच्या नृसिंहोत्तरतापनीय नामक उपनिषदांत सांगितलेलें आहे. ॥६२॥

- इतर श्रुतींचा निर्देश-

सद्रूपमारुणि: प्राह प्रज्ञानं ब्रह्म बह्वृच: ।
सनत्कुमार आनंदमेवमन्यत्र गम्यताम् ॥६३

अन्वयार्थ - [आरुणि: सद्रूपं प्राह-] छान्दोग्यांत 'उद्दालक-' नांवाचा अरुणपुत्र सद्रूप ब्रह्माचें निरूपण करिता झाला. [बह्वृच: प्रज्ञानं ब्रह्म इति प्राहु:-] ऋक्शाखाध्यायी ऐतरेयोपनिषदांत 'प्रज्ञा प्रत्तिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म' असें ब्रह्माचें प्रज्ञानरूप सांगतात. [सनत्कुमार: आनंदं आह-] छान्दोग्यांत सनत्कुमार 'भूम-' संज्ञक ब्रह्माचें आनंदरूपत्व सांगता झाला [अन्यत्र एवं गम्यताम्-] तैत्तिरीयादि इतर श्रुतींत असेंच 'आनंदो ब्रह्मेति व्यजानात्' इत्यादि वाक्यांनीं आनंदरूपत्व सांगितलें आहे.

प्रकाश:- छान्दोग्याच्या सहाव्या अध्यायांत अरुणपुत्र उद्दालक आपल्या पुत्रास 'हे प्रिय पुत्रा, सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी हें सर्व जग सत् होतें' अशा रीतीनें सद्रूप ब्रह्माचा उपदेश करिता झाला. त्यावरून ब्रह्माच्या सत् या रूपाचें ज्ञान होतें. ऐतरेयोपनिषदाच्या पांचव्या खंडांत 'प्रज्ञान हेंच ब्रह्म आहे' असें सांगितलें आहे. तसेंच छन्दोग्याच्या आठव्या अध्यायांत सनत्कुमार नामक गुरु आपल्या नारदसंज्ञक प्रसिद्ध शिष्यास 'भूमा नामक ईश्वरास जाणण्याची इच्छा करावी. जो भूमता तेंच सुख होय. कारण परिच्छिन्न पदार्थांत सुख नसतें.' असें सांगते झाले. तैत्तिरीयादि दुसऱ्याहि अनेक श्रुतींत 'आनंदो ब्रह्म' इत्यादि प्रकारें निर्देश आहे. ॥६३॥

-आतां सच्चिदानंदादिकांप्रमाणेंच नामरूपांविषयीं श्रुति दाखवितात -

विचिंत्य सर्वरूपाणि कृत्वा नामानि तिष्ठति ।
अहं व्याकरवाणीमे नामरूपे इति श्रुते: ॥६४

अन्वयार्थ - [सर्वरूपाणि विचिन्त्य च नामानि कृत्वा तिष्ठति-] सर्व रूपांविषयीं पूर्ण चिंतन करून व त्यांना नांवें ठेवून राहतो. तो [अहं इमे नामरूपे व्याकरवाणि इति श्रुते:-] 'मीं हीं नामरूपें व्यक्त करावीं' अशी श्रुति आहे.

प्रकाश:- 'जो ज्ञानरूप ईश्वर सर्व स्वरूपांविषयीं (आकृतींविषयीं) चिंतन करून व त्यास नांवें देऊन त्याप्रमाणें त्यांचा व्यवहारांत उपयोग करीत राहतो' अशी व आता 'मीं हीं नामरूपें व्यक्त करितों' इत्यादि अर्थांच्या अनेक श्रुति असल्यामुळें जग नामरूपात्मक आहे, असा निश्चय करितां येतो. ॥६४॥

-याविषयींच आणखी एका श्रुतीचा निर्देश-

अव्याकृतं पुरा सृष्टेरुर्ध्वं व्याक्रियते द्विधा ।
अचिंत्यशक्तिर्मायैषा ब्रह्मण्यव्याकृताभिधा ॥६५

अन्वयार्थ - [सृष्टे: पुरा अव्याकृतं अभूत्-] सृष्टीच्या पूर्वीं अव्यक्त होतें. [ऊर्ध्वं द्विधा व्याक्रियते-] तेंच पुढें दोन प्रकारें व्यक्त केलें जातें [या एषा ब्रह्मणि अचिंत्यशक्ति: माया अस्ति सा अव्याकृताभिधा-] जी ही ब्रह्माच्या ठिकाणीं अचिंत्य शक्ति, माया आहे, तीच 'अव्याकृत-' संज्ञक होय.

प्रकाश:- बृहदारण्यकांत सांगितलें आहे कीं 'पूर्वीं हें जग अव्यक्त होतें. पण तेंच पुढें बीजांकुरन्यायानें नामरूपद्वारा व्यक्त झालें.' म्हणजे हा अमुक पदार्थ अमुक नांवाचा व अमुक आकाराचा आहे, इत्यादिप्रकारें व्यवहार करिता येण्यासारख्या अवस्थेस तें पोंचलें. या सर्वांचें तात्पर्य असें - सृष्टीच्यापूर्वीं हें

जग अव्याकृत होतें. म्हणजे त्याचें नांव व रूप व्यक्त नव्हतें. पण सृष्टिसमयीं तें वाच्य व वाचक, म्हणजे घटादि पदार्थ व घट, पट, मठ इत्यादि शब्द यांच्या योगानें तें व्यक्त झालें. उत्पत्तीच्या पूर्वीं जी अव्यक्त अवस्था होती, त्या अचिंत्य शक्तीसच माया म्हणतात. अव्याकृत असें या अवस्थेचेंच नांव होय. ॥६५॥

-'तन्नामरूपाभ्यामेव व्याक्रियते' या श्रुतिवचनाचा अर्थ -

अविक्रियब्रह्मनिष्ठा विकारं यात्यनेकधा ।
मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ॥६६

अन्वयार्थ - [अविक्रियब्रह्मनिष्ठा सा अनेकधा विकारं याति-] विकारशून्य ब्रह्मामध्यें राहणारी ती माया भूतभौतिकप्रपंचरूपानें अनेक प्रकारें विकार-परिणाम पावते. 'माया ब्रह्मामध्यें राहते' याविषयीं प्रमाण - [मायां तु प्रकृतिं विद्यात् तु मायिनं महेश्वरं विद्यात्-] मायेला प्रकृति समजावें व ती माया ज्याच्या जवळ असते, त्या मायावीला महेश्वर समजावें.

प्रकाश:- प्रकृति म्ह० उपादान कारण. मायेचा आश्रय या नात्यानें मायावान् महेश्वर म्ह० मायेचा नियामक. येथील दोन्ही 'तु' - शब्द माया व महेश्वर यांचें अत्यंत वैलक्षण्य दाखवितात, कोणत्याहि समयीं विकार न पावणाऱ्या ब्रह्माच्या आश्रयानें ती माया असते व सृष्टिकाल प्राप्त झाला असतां तीं भूतें व भौतिक पदार्थ यांच्या योगानें विकार पावते. आतां याविषयीं प्रमाण काय ह्मणून विचाराल तर सांगतों; "या पूर्वोक्त मायेलाच जगाचें उपादान कारण म्हणावें. व तिला आश्रय देणाऱ्या ब्रह्माला महेश्वर म्हणावें" अशा अर्थाची श्रुति, याविषयीं प्रमाण आहे. ॥६६॥

-आतां मायारूप उपाधीनें युक्त असलेल्या ब्रह्माचें पहिलें कार्य सांगतात -

आद्यो विकार आकाश: सोऽस्ति भात्यपि च प्रिय:।
अवकाशस्तस्य रूपं तन्मिथ्या न तु तत्त्रयम् ॥६७

अन्वयार्थ - [आद्य: विकार: आकाश:-] पहिला विकार आकाश आहे. [स: अस्ति भाति अपि च प्रिय:-] तें आहे, भासतें व प्रियरूप असतें. [तस्य रूपं अवकाश:-] त्याचें स्वत:चें रूप अवकाश आहे. [तत् मिथ्या-] पण तें मिथ्या आहे. [तु तत् त्रयं न-] पण त्याचें पूर्वोक्त सत्-चित्-सुखरूप मिथ्या नाहीं.

प्रकाश:- सोपाधिक ब्रह्माचें पहिलें कार्य आकाश होय. त्याच्यामध्यें तीन कारणाचे व एक स्वत:चा असे चार गुण राहतात. अस्तित्व, भान व प्रियता हे त्याच्या कारणापासून आलेले गुण असून अवकाश हें त्याचें स्वत:चें रूप आहे. पण तें मिथ्या आहे. कारण कार्याचे गुण सर्वदा अनित्य असतात. अर्थात् अस्तित्वादि कारणगुण नित्य होत. ॥६७॥

-'पण आकाशाचें अवकाश हें रूप मिथ्या कां?' उत्तर -

न व्यक्ते: पूर्वमस्त्येव व पश्चाच्चापि नाशत: ।
आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा ॥६८

अन्वयार्थ - [व्यक्ते: पूर्वं न अस्ति एव-] तें व्यक्त होण्याच्या पूर्वीं नसतेंच [च नाशत: पश्चात् अपि न-] व नाशानंतरहि नसतें. तथापि उत्पत्तीपासून विनाशापर्यंत भासणाऱ्या त्याला मिथ्यात्व कसें ? उत्तर - [यत् आदौ अंते च न अस्ति तत् वर्तमाने अपि तथा-] जें पूर्वीं व नंतर नसतें तें वर्तमानकालींहि तसेंच असतें म्ह० नसतें.

प्रकाश:- अवकाशसंज्ञक आकाशाचें जें रूप आहे, तें आकाशाची उत्पत्ती होण्यापूर्वीं व नंतर नसतें. आणि जें उत्पत्तिपूर्वीं नाहीं व नाशानंतर नसतें, तें स्थितिकालीं मात्र भासणारें आकाशाचें रूपहि असत् आहे; केवल भासमान होणारें आहे; असें समजावें. ॥६८॥

-याविषयीं आतां श्रीकृष्णांच्या वचनाचें प्रमाण देतात -

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येवेत्याह कृष्णोऽर्जुनं प्रति ।।६९

अन्वयार्थ - [हे भारत, अव्यक्तादीनि व्यक्तमध्यानि च अव्यक्तनिधनानि एव भूतानि इति कृष्ण: अर्जुनं प्रति आह-] हे अर्जुना, ज्यांचें कारण अव्यक्त आहे, मध्यावस्था व्यक्त आहे व पुन: नाशानंतरची अवस्था अव्यक्त आहे, अशीं हीं भूतें आहेत, असें श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितलें आहे.

प्रकाश:- उत्पत्तीच्या पूर्वी सर्व भूतें अव्यक्त अवस्थेंत असतात, व नाशानंतरहि तीं अव्यक्त होतात. पण उत्पत्तीपासून नाशापर्यंत जी अवस्था त्या मध्यवस्थेंत मात्र त्यांचें प्रत्यक्ष ज्ञान होत असतें. असें द्वारकाधीश भगवानानेंहि अर्जुनास सांगितलें आहे. भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत प्रस्तुत श्लोकाचे तीन चरण आहेत, हें बहुश्रुत वाचकांस ठाऊक आहेच. ।।६९ ।।

-सत्त्व, भास व प्रियरूपता हे तीन कारण-गुण आकाशांत असतात, याविषयीं अनुभव हेंच प्रमाण सांगतात -

मृद्वत्ते सच्चिदानन्दा अनुगच्छन्ति सर्वदा ।
निराकाशे सदादीनामनुभूतिर्निजात्मनि ।।७०

अन्वयार्थ - [मृद्वत् ते सच्चिदानंदा: सर्वदा अनुगच्छंन्ति-] आपल्या गुणांसह मृत्तिका जशी घटादि कार्यांत सदा अनुवृत्त होते, त्याप्रमाणें सत्, चित् व आनंद हे आत्मगुण आपल्या आकाशसंज्ञक कार्यांत सदा अनुवृत्त होतात. पण आकाशास सोडून सदादि गुणांचा अनुभव कसा येणार ? उत्तर - [निराकाशे निजात्मनि सदादीनां अनुभूति: भवति-] जेव्हां आकाशाचा लय झालेला असतो तेव्हां स्वरूपामध्येंच सत्, चित् व आनंद यांचा अनुभव येतो.

प्रकाश:- आपल्या गुणांसह मुत्तिका जशी घटादि कार्यांत अनुवृत्त होते, त्याप्रमाणें सत्, चित् व आनंद हे आत्मगुण आपल्या आकाशसंज्ञक कार्यांत अनुवृत्त होतात. अनुवृत्त या शब्दाचा अर्थ मागून आलेला असा आहे. म्हणजे पूर्वी कारणामध्यें असलेले गुण कार्योत्पत्तीनंतर कार्यामध्यें येणें हीच त्या गुणांची अनुवृत्ति होय. पण आकाशास सोडून सदादि गुणांचा अनुभव कसा येणार ? व जर तो येण्यासारखाच नाहीं तर कारणांमध्यें अमुक अमुक गुण आहेत, असा निश्चय कसा करितां येईल ? असा कोणी प्रश्न करील म्हणून ग्रंथकार म्हणतात :- जेव्हां आकाशाचा लय झालेला असतो तेव्हां स्वरूपांमध्येंच सत्, चित्, व आनंद यांचा अनुभव येतो. ।।७०।।

-त्याचेंच उपपादन -

अवकाशे विस्मृतेऽथ तत्र किं भाति ते वद ।
शून्यमेवेति चेदस्तु नाम तादृग्विभाति हि ।।७१

अन्वयार्थ - [अवकाशे विस्मृते सति अथ तत्र ते किं भाति वद-] अवकाशाचें विस्मरण झालें असतां त्यानंतर तेथें तुला काय भासतें ? सांग [शून्यं एव इति चेत्-] शून्यच भासतें म्हणून जर म्हणशील तर [अस्तु नाम तादृक् विभाति हि-] तेंच असो. शून्य - कांहीं नाहीं हें तरी पण भासतेंच !

प्रकाश:- चित्ताचा निरोध किंवा लय झाला असतां आकाशादि सर्व कार्याचें विस्मरण होतें, हें आबालवृद्धांस ठाऊक आहे. पण तेव्हां पूर्वी भासणाऱ्या आकाशादिकांच्या ठायीं तुला काय भासतें तें सांग पाहू ? असा सिद्धांत्यांनीं प्रश्न केला असतां वादी म्हणतो, सर्वांचाच लय झाल्यावर शून्यावांचून दुसरें काय भासणार ? हें वाद्याचें म्हणणें ऐकून सिद्धान्ती म्हणतात:- बरें आहे; तूं त्याला शून्य असेंच म्हण शून्य कां होईना पण तें तरी असतेंना ! झालें तर. शब्दाकरितां आम्ही कधींच भांडत नाहीं. त्याच्या अर्थाकरितां मात्र आमचा आग्रह असतो. पण तो 'कांहीं तरी असतें' एवढ्या तुमच्या म्हणण्यानेंच सफल होत आहे. ।।७१।।

- अर्थात् -

तादृक्त्वादेव तत्सत्त्वमौदासीन्येन तत्सुखम् ।
आनुकूल्यप्रातिकूल्यहीनं यत्तन्निजं सुखम् ।।७२

अन्वयार्थ - [तादृक्त्वात् एव तत्सत्त्वम्-] 'शून्य असतें' असें म्हटल्यानेंच त्याचें अस्तित्व स्वीकारल्यासारखेंच होतें. [औदासीन्येन तत्सुखं-] तें उदासीतनेचा विषय असल्यामुळें सुखरूप आहे. [यत् आनुकल्यप्रातिकूल्यहीनं तत् निजं सुखं-] कारण जें अनुकूल व प्रतिकूल या भावांनीं रहित असतें, तेंच आत्मसुख होय.

प्रकाश:- 'शून्य असतें' असें म्हटल्यानेंच जें कांहीं असतें त्याचें अस्तित्व स्वीकारिल्यासारखें होतें. तें उदासीनतेचा विषय असल्यामुळेंच सुखरूप आहे असाहि निश्चय होतो. कारण जें अनुकूल व प्रतिकूल या भावांनीं रहित असतें, तेंच आत्मसुख होय. व्यावहारिक सुखाची व्याख्या याहून जरा भिन्न आहे. म्हणजे जें अनुकूल वाटतें त्यालाच व्यवहारांत सुख म्हणतात. पण हें आत्मसुख परस्परविरुद्ध अशा या दोन्ही कोटींहून विलक्षण आहे. ।।७२।।

- याचेंच उपपादन -

आनुकूल्ये हर्षधी: स्यात्प्रातिकूल्ये तु दु:खधी: ।
द्वयाभावे निजानन्दो निजदु:खं न तु क्वचित्।।७३

अन्वयार्थ - [आनुकूल्ये हर्षधी: स्यात्-] अनुकूलतेमध्यें हर्षबुद्धि होते. [प्रातिकूल्ये तु दु:खधी:-] प्रतिकूलतेमध्यें दु:खबुद्धि होते. [द्वयाभावे निजानंद:-] पण या दोन्ही बुद्धीचा अभाव झाला असतां निजानंद होतो. मग तसेंच निजदु:खहि कां नाहीं ? उत्तर - [निजदु:खं तु क्वचित् अपि न -] निजदु:ख तर कधींहि होत नाहीं. कारण दु:खामध्यें निजरूपाची सिद्धि होत नाहीं.

प्रकाश:- जो पदार्थ आपणांस अनुकूल वाटतो, त्याची प्राप्ति झाली असतां किंवा प्राप्ति होणार असें समजलें असतां मन हर्षयुक्त होतें व जो पदार्थ आपणांस प्रतिकूल वाटतो त्याची प्राप्ति झाली असतां किंवा प्राप्ति होणार असें समजलें असतां मन दु:खपूर्ण होतें. पण या दोन्ही अंत:करणाच्या वृत्ति आहेत. त्यामुळें त्या जरी एक सुखरूप व दुसरी दु:खरूप अशा दोन प्रकारच्या भासल्या, तरी वस्तुत: दु:खरूपच आहेत. सर्व वृत्तींचा निरोध झाल्यावरच आत्मानंदाचा अनुभव येत असतो. सर्व वृत्तींचा निरोध झाल्यावर आत्मानंदाप्रमाणें आत्मदु:खाचा अनुभव येत नसल्यामुळें आत्मा आनंदरूपच आहे, असा भाग्यवान् मुमुक्षूंस निश्चय करितां येतो. ।।७३।।

-'निजानंद जर नित्य आहे तर सर्वदा आनंदच कां होत नाहीं ? शोक कां होतो ?' उत्तर -

निजानन्दे स्थिरे हर्षशोकयोर्व्यत्यय: क्षणात्
मनस: क्षणिकत्वेन तयोर्मानसतेष्यताम् ।।७४

अन्वयार्थ - [निजानंदे स्थिरे सति हर्षशोकयो: व्यत्यय: क्षणात् स्यात्-] आत्मानंद जरी स्थिर आहे तरी हर्ष व शोक यांचा व्यत्यय एका क्षणांत होतो [च मनस: क्षणिकत्वेन तयो: मानसता इष्यताम्-] व मनाला क्षणिकत्व असल्यामुळें हर्ष व शोक यांना मानसता आहे, असें मानावें.

प्रकाश:- हा आत्मानंद स्थिर झाला असतां हर्ष व शोक या दोन्ही वृत्ति लीन होतात. व्यत्यय या शब्दाचा येथें 'सर्व प्रकारें शून्यता' असा अर्थ करावा. मन क्षणिक असल्यामुळें त्याच्यामुळेंच भासणाऱ्या या हर्ष शोकांसहि मानसता ह्मणजे मानसपणा आहे, असा अंगीकार करावा. आणि हर्ष व शोक मनोमय असल्यामुळें व तें मनच स्वत: क्षणिक असल्यामुळे, तेंहि क्षणिक आहेत असें समजावें. ।।७४।।

-दृष्टान्तानें सिद्ध झालेला अर्थ आतां दार्ष्टांतिकामध्यें योजून दाखवितात -

आकाशेऽप्येवमानन्द: सताभाने तु सम्मते ।
वाय्वादिदेहपर्यन्तं वस्तुष्वेवं विभाव्यताम् ।।७५

अन्वयार्थ - [एवं आकाशे अपि आनंद: अस्ति-] निजात्म्यामध्यें सांगितलेल्या प्रकारानें आकाशामध्येंहि आनंद आहे.[सत्ताभाने तु संमते-] सत्ता व भान तर तुम्हांलाहि मान्य आहे [वाय्वादिदेहपर्यंतं वस्तुषु एवं विभाव्यताम्-] वायूपासून देहापर्यंत ज्या वस्तु आहेत त्या सर्वांमध्यें अशीच सच्चित्सुखभावना करावी.

प्रकाश:- स्वात्म्यामध्यें आनंद आहे, असें पूर्वी सिद्ध केलें आहे, त्याप्रमाणें आकाशामध्येंहि आनंद आहे. त्याच्या अस्तित्वाविषयीं व प्रत्ययाविषयीं तर कोणीहि वाद करणार नाहींच. सारांश वायु, तेज, इत्यादि सर्व वस्तूंच्या ठायीं ही अशीच योजना करावी. ॥७५॥

-आतां वायु, तेज इत्यादि भूतांचे असाधारण धर्म सांगतात -

गतिस्पर्शौ वायुरूपं वह्नेर्दाहप्रकाशने ।
जलस्य द्रवता भूमे: काठिन्यं चेति निर्णय: ॥७६

अन्वयार्थ - [गतिस्पर्शौ वायुरूपम्-] गति व स्पर्श हें वायूचें रूप आहे; [वह्ने: दाहप्रकाशने-] अग्नीचें दाह व प्रकाश हें रूप आहे; [जलस्य द्रवता-] जलाचें स्वरूप द्रवत्व [च भूमे: काठिन्यं इति निर्णय:-] व भूमीचें काठिन्य, असा निर्णय समजावा. प्र. २ श्लो. ३-५.

प्रकाश:- या श्लोकांत वायु, तेज, उदक व भूमि या भूतांचे मुख्य धर्म कोणते आहेत, तें सांगितलें आहे. भूतविवेक नामक दुसऱ्या प्रकरणांत याविषयीं विस्तृत विवेचन होऊन गेलेलें असल्यामुळें त्याचा आता पुन: विस्तार करीत नाहीं. ॥७६॥

असाधारण आकार औषध्यन्नवपुष्यपि ।
एवं विभाव्यं मनसा तत्तद्रूपं यथोचितम् ॥७७

अन्वयार्थ - [एवं औषध्यन्नवपुषि अपि असाधारण: आकार: ज्ञेय:-] ह्याप्रमाणेंच ओषधि, अन्न, शरीर यांमध्येंहि असाधारण आकार जाणावा [एवं मनसा यथोचितं तत्तद्रूपं विभाव्यम्-] ह्या पद्धतीनेंच विचार करून सर्व वस्तूंचें भिन्न भिन्न असाधारणरूप ओळखावें.

प्रकाश:- गेल्या श्लोकांत सांगितलेल्या पद्धतीनेंच वृक्ष, वेली, धान्य, शरीरें इत्यादिकामध्येंहि असाधारण धर्म कोणता आहे, त्याचा निश्चय करावा. तात्पर्य, मनामध्यें विचार करून सर्व पदार्थांतील असाधारण धर्म अशाच रीतीनें ओळखावा. ॥७७॥

- सारांश -

अनेकधा विभिन्नेषु नामरूपेषु चैकधा ।
तिष्ठन्ति सच्चिदानन्दा विसंवादो न कस्यचित् ॥७८

अन्वयार्थ - [अनेकधा विभिन्नेषु नामरूपेषु सच्चिदानंदा: एकधा तिष्ठन्ति-] अनेक प्रकारें अति भिन्न झालेल्या नाम-रूपात्मक जगामध्यें सत्, चित् व आनंद एकरूपानेंच स्थित आहेत. [अत्र कस्यचित् विसंवाद: न अस्ति-] याविषयीं कोणाचाहि विवाद नाहीं.

प्रकाश:- जगांतील प्रत्येक पदार्थ भिन्न भिन्न असून त्यांचीं नांवें व आकारहि भिन्न भिन्न असतात. पण त्यांतील प्रत्येकामध्यें सत्ता, भान व प्रियरूपता हे धर्म असतात व याविषयीं कोणाचा फारसा वादहि नाहीं. ॥७८॥

-'तर मग प्रतीत होणाऱ्या नामरूपांची काय वाट ?' उत्तर -

नि:सत्त्वे नामरूपे द्वे जन्मनाशयुते च ते ।
बुद्ध्या ब्रह्मणि वीक्षस्व समुद्रे बुद्बुदादिवत् ॥७९

अन्वयार्थ - [नामरूपे द्वे निस्तत्त्वे च जन्मनाशयुते-] नाम व रूप हीं दोन्ही निस्तत्त्व व जन्मनाशयुक्त आहेत; [अत: समुद्रे बुद्बुदादिवत् बुद्ध्या ते ब्रह्मणि वीक्षस्व-] यास्तव समुद्रांतील बुडबुडे, फेंस इत्यादिकांप्रमाणें विवेकबुद्धीनें तीं ब्रह्मामध्यें कल्पित आहेत, असें जाण.

प्रकाश:- समुद्रामध्यें लाटा, बुडबुडे, फेंस इत्यादि अनेक विकार होतात. पण वस्तुत: ते समुद्राहून भिन्न नसतात, हें सर्वांस ठाऊक आहेच. शिवाय ते कांहीं निमित्तामुळें उत्पन्न होणारे व निमित्ताचा नाश झाला असतां नाश पावणारे असतात. आणि या सर्व कारणांवरून समुद्र नित्य व त्याचे विकार अनित्य असा निश्चय होतो. या दृष्टान्ताप्रमाणेंच हें सर्व नामरूपकात्मक जगत् स्वत: तत्त्वशून्य व जन्मनाशयुक्त असल्यामुळें मिथ्या आहे व त्याचा ब्रह्माचे ठायीं आभास होत असल्यामुळें तें ब्रह्मच सत्य व तत्त्वभूत आहे असा विवेकाच्या योगानें निश्चय करावा. ॥७९॥

- त्यानंतर -

सच्चिदानन्दरूपेऽस्मिन्पूर्णे ब्रह्मणि वीक्षिते ।
स्वयमेवावजानाति नामरूपे शनै: शनै: ॥८०

अन्वयार्थ - [अस्मिन् पूर्णे सच्चिदानंदरूपे ब्रह्मणि वीक्षिते सति-] या पूर्ण सच्चिदानंदरूप ब्रह्माला पाहिलें असतां [नामरूपं शनै: शनै: स्वयं एव अवजानाति-] तत्त्वज्ञ नाम व रूप यांची हळुहळू आपोआपच अवज्ञा-दुर्लक्ष करूं लागतो.

प्रकाश:- अधिष्ठानाचें ज्ञान झालें असतां विकारांचें तत्त्व समजतें व त्यामुळें त्यांविषयीं हळु हळू अनादार वाटूं लागतो. ॥८०॥

- द्वैताची अवज्ञा केल्यानेंच ब्रह्मज्ञान दृढ होतें. यास्तव श्रवणादिकांप्रमाणें द्वैताची अवज्ञाहि करावी, असें सांगतात -

यावद्यावदवज्ञा स्यात्तावत्तावत्तदीक्षणम् ।
यावद्यावद्वीक्ष्यते तत्तावत्तावदुभे त्यजेत् ॥८१

अन्वयार्थ - [यावत् यावत् अवज्ञा स्यात् तावत् तावत् तदीक्षणम्-] नामरूपात्मक द्वैताची जशी जशी अवज्ञा होत जाते तसें तसें त्याचे दर्शन स्पष्ट होतें [यावत् यावत् तत् वीक्ष्यते तावत् तावत् उभे त्यजेत्-] व जसें जसें त्याचें दर्शन होतें तसा तसा त्या उभयतांचा त्याग होतो.

प्रकाश:- द्वैताविषयीं पूर्ण अनादर वाटल्यावांचून ब्रह्मज्ञान दृढ होत नाहीं. यास्तव मोठ्या प्रयत्नानें द्वैताचा अनादर करावा व तो जसा जसा अधिक होऊं लागतो, तसा तसा साक्षात्कार वाढतो, व जसा जसा साक्षात्कार वाढेल तसा तसा त्या नामरूपाचा त्याग करावा. ॥८१॥

- द्वैताचा अनादर व आत्मदर्शन यांच्या अभ्यासापासून कोणतें फल मिळतें, तें सांगतात-

तदभ्यासेन विद्यायां सुस्थितायामयं पुमान् ।
जीवन्नेव भवेन्मुक्तो वपुरस्तु यथा तथा ॥८२

अन्वयार्थ - [तदभ्यासेन विद्यायां सुस्थितायां सत्यां अयं पुमान् जीवन् एव मुक्त: भवेत्-] त्यांच्या अभ्यासानें विद्या अति स्थिर झाली असतां हा पुरुष जीवन्मुक्तच होतो. [तत: परं वपु: यथा तथा अस्तु-] त्यानंतर शरीर कोणत्याहि अवस्थेंत राहो.

प्रकाश:- नामरूपात्मक द्वैताचा अनादर व सर्वांमध्यें भरून राहिलेल्या सच्चिदानंदाचें सतत अनुसंधान या उभयतांचाहि दीर्घकाल अभ्यास घडून विद्या दृढ झाली असतां साधक जीवन्मुक्त होतो. हा परम लाभ एकदा झाला कीं मग नाश पावणारें शरीर कसेंहि व कोठेंहि का राहीना. त्याच्यामुळें साधकाची कांहीं एक हानि होत नाहीं. ॥८२॥

- आतां ब्रह्माभ्यासाचें स्वरूप सांगतात -

तच्चिंतनं तत्कथनमन्योन्यं तत्प्रबोधनम् ।
एतदेकपरत्वं च ब्रह्माभ्यासं विदुर्बुधा: ॥८३

अन्वयार्थ - [तच्चिंतनं तत्कथनं अन्योन्यं तत्प्रबोधनं च एतदेकपरत्वं बुधा: ब्रह्माभ्यासं विदु:-] त्या चिद्रूप ब्रह्माचेंच चिंतन करणें, त्या निजानंदाचेंच कीर्तन करणें, कोणाची गांठ पडली असतां परस्पर त्याचाच उत्तम प्रकारें बोध करणें व येणेंप्रमाणें त्या सद्रूपाचे ठिकाणींच तत्पर होऊन

राहाणें, यास ज्ञानी ब्रह्माभ्यास समजतात.

प्रकाश:- सातव्या प्रकरणांत हाच श्लोक आलेला आहे. यास्तव याचें व्याख्यान ज्यास पाहावयाचें असेल त्यांनीं तेथें पाहावें. ॥८३॥

-'पण अनादि कालापासून प्रवृत्त झालेल्या द्वैतवासनेचा केव्हां केव्हां केलेल्या ज्ञानाभ्यासानें क्षय कसा होणार ?' उत्तर -

वासनानेककालीना दीर्घकालं निरंतरम् ।
सादरं चाभ्यस्यमाने सर्वथैव निवर्तते ॥८४

अन्वयार्थ - [अनेककालीना वासना दीर्घकालं निरंतरं च सादरं अभ्यस्यमाने सति सर्वथा एव निवर्तते-] अनादिकालापासून प्रवृत्त झालेली वासना दीर्घकाल, अहोरात्र व आदरपूर्वक अभ्यास केला असतां संपूर्णपणेंच निवृत्त होते.

प्रकाश:- अनादि कालापासून प्रवृत्त झालेल्या वासनेस अनेककालिना असें येथें म्हटलें आहे. ती जरी परमेश्वराप्रमाणेंच अति प्राचीन आहे हें खरें आहे, तरी अनेक वर्षें किंवा अनेक जन्महि अहोरात्र व आदरपूर्वक ब्रह्माभ्यास केला असतां ती पूर्णपणें निवृत्त होते. ॥८४॥

-'पण, एक व अद्वितीय ब्रह्म अनेक आकारांनीं युक्त असलेल्या जगाचें कारण कसें होतें ?' उत्तर -

मृच्छक्तिवद्ब्रह्मशक्तिरनेकाननृतान्सृजेत् ।
यद्वा जीवगता निद्रा स्वप्नश्चात्र निदर्शनम् ॥८५

अन्वयार्थ - [मृच्छक्तिवत् ब्रह्मशक्तिः अनेकान् सृजेत्-] मृत्तिकेंतील शक्ति अनेक कार्यांना जशी उत्पन्न करिते त्याप्रमाणें ही ब्रह्मशक्ति अनेक मिथ्या पदार्थांस निर्माण करिते. म्हणजे शुद्ध ब्रह्म जरी विचित्र जगत् करण्यास समर्थ नसलें तरी मायाशक्तियुक्त ब्रह्म जगत्कारण होऊं शकतें. 'पण मृच्छक्ति सत्य आहे. तशी मायाशक्ति नाहीं, यास्तव हा दृष्टान्त विषम आहे' अशी शंका घेऊन दुसरा पक्ष सांगतात - [यद्वा जीवगता निद्रा च स्वप्नः अत्र निदर्शनं अस्ति-] किंवा जीवगत निद्रा व स्वप्न यांचा येथें दृष्टान्त द्यावा.

प्रकाश:- ज्याप्रमाणें मृत्तिकारूप शक्तिपासून घटादि अनेक आकार होतात, त्याप्रमाणेंच या मायाख्य ब्रह्मशक्तीच्या द्वारा हें विचित्र जग होतें असें समजावें. पण मृत्तिकेंतील शक्ति सत्य असल्यामुळें ती अनेक कार्यांस कारण होऊ शकते. हें म्हणणें जरी बरोबर आहे, तरी तोच न्याय ब्रह्मशक्तीच्या ठायीं लागू करणें बरोबर नाहीं. कारण ती मिथ्या आहे असें तुम्हींच आपल्या तोंडानें सांगत असतां, असें कदाचित् कोणी म्हणेल म्हणून ग्रंथकार म्हणतात. - अथवा जीवाची निद्रा व स्वप्न यांच्या क्रमानें शक्ति व कार्य यांस दृष्टांत द्यावा. हा दृष्टांत पुढें स्पष्ट होणार आहे. ॥८५॥

- स्वप्नदृष्टान्तालाच विशद करितात -

निद्राशक्तिर्यथा जीवे दुर्घटस्वप्नकारिणी ।
ब्रह्मण्येषा स्थिता माया सृष्टिस्थित्यंतकारणी ॥८६

अन्वयार्थ - [यथा निद्राशक्तिः जीवे दुर्घटस्वप्नकारिणी-] ज्याप्रमाणें निद्राशक्ति जीवाच्या स्वरूपांत अघटित स्वप्न करविणारी असते, [तथा ब्रह्मणि एषा माया सृष्टिस्थित्यंतकारिणी स्थिता अस्ति-] त्याप्रमाणें ब्रह्माच्या ठिकाणीं ही माया जगाची उत्पत्ति स्थिति व लय करविणारी आहे.

प्रकाश:- आभासरूप जीवामध्यें निद्राशक्ति राहते व ती स्वसामर्थ्यानें कधींहि न घडणारें असें स्वप्न दाखविते, हें सुप्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेंच शबल ब्रह्माचे ठिकाणीं ही मायासंज्ञक शक्ति राहते व ती या विचित्र जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करिते. ॥८६॥

-निद्राशक्तीचें दुर्घटकारित्वच दाखवितात -

स्वप्ने वियद्गतिं पश्येत्स्वमूर्धच्छेदनं यथा ।
मुहूर्ते वत्सरौघं च मृतपुत्रादिकं पुनः ॥८७

अन्वयार्थ - [जीवः स्वप्ने वियद्गतिं पश्येत्-]

जीव स्वप्नामध्यें मी आकाशांत चालत आहें असें पाहतो; [यथा स्वमूर्धच्छेदनं पश्येत्-] तसेंच आपलें मस्तक तुटलें आहे असें पाहतो; [मुहूर्ते वत्सरौघं च मृतपुत्रादिकं पुनः पश्येत्-] एका मुहूर्तात अनेक वर्षे लोटलीं आहेत असें मानून मेलेल्या पुत्रादिकांस पुनः पाहतो.

प्रकाशः- स्वढ'पमिध्यें काय काय दिसतें, त्या सर्वांचा येथें संग्रह करणें अशक्य आहे. यास्तव ग्रंथकारांनीं प्रस्तुत श्लोकांत चार अघटित गोष्टींचा निर्देश केला आहे. त्यांचा बहुतेकांस अनुभव येत असेलच. ॥८७॥

- स्वप्नाच्या दुर्घटत्वाचें कारण -

इदं युक्तमिदं नेति व्यवस्था तत्र दुर्लभा ।
यथा यथेक्ष्यते यद्यत्तत्तद्युक्तं तथा तथा ॥८८

अन्वयार्थ - [इदं युक्तं इदं न इति व्यवस्था तत्र दुर्लभा-] हें युक्त आहे व हें नाहीं, अशी व्यवस्था स्वप्नात करितां येत नाहीं. [यत् यत् यथा यथा ईक्षते तत् तत् तथा तथा युक्तं-] जें जें जसें जसें पाहिलें जातें, तें तें तसे तसेंच युक्त होय.

प्रकाशः- स्वप्नामध्यें आपण जें जें पाहातों, तें तें योग्य आहे कीं अयोग्य आहे याचा तेव्हांच निकाल करितां येत नाहीं. कारण स्वप्नामध्यें प्राणी जें जें कांहीं जशा जशा प्रकारें पाहातो तें तें त्या त्या प्रमाणेंच युक्त आहे, असें त्यास वाटत असतें. त्याच्या विषयीं त्याला शंका अशी मुळींच येत नाहीं. ॥८८॥

- हा उक्तार्थच कैमुतिकन्यायानें स्पष्ट करितात -

ईदृशो महिमा दृष्टो निद्राशक्तेर्यदा तदा ।
मायाशक्तेरचिंत्योऽयं महिमेति किमद्भुतम् ॥८९

अन्वयार्थ - [निद्राशक्तेः यदा ईदृशः महिमा दृष्टः-] निद्राशक्तीचा जेव्हां अशा प्रकारचा महिमा दिसतो, [तदा मायाशक्तेः अयं अचिंत्यः महिमा इति किं अद्भुतम्-] तेव्हां मायाशक्तीचा इतका अचिंत्य महिमा असला, तर त्यांत काय आश्चर्य आहे !

प्रकाशः- म्हणजे निद्रेसारखी सामान्य व सर्वप्राणिसाधारण अशी शक्ति ही जर एवढें आश्चर्य करू शकते, तर अचिन्त्य प्रभावशाली ईश्वराची माया काय पाहिजे तें करील यांत काय संशय आहे ? व त्यामध्यें आश्चर्य तें कोणतें ? ॥८९॥

-'प्रवृत्तिशून्य ब्रह्मामध्यें राहणारी माया जगाचें कारण कशी होते,' याविषयीं दृष्टान्त -

शयाने पुरुषे निद्रा स्वप्नं बहुविधं सृजेत् ।
ब्रह्मण्येवं निर्विकारे विकारान्कल्पयत्यसौ ॥९०

अन्वयार्थ - [यथा शयाने पुरुषे निद्रा बहुविधं स्वप्नं सृजेत्-] ज्याप्रमाणें शयन करणाऱ्या पुरुषामध्यें निद्रा नानाप्रकारच्या स्वप्नाला उत्पन्न करिते, [एवं निर्विकारे ब्रह्मणि असौ विकारान् कल्पयति-] त्याप्रमाणें विकारशून्य ब्रह्माचे ठिकाणीं माया विकारांची कल्पना करिते.

प्रकाशः- पुरुष निश्चेष्ट होऊन शय्येवर स्वस्थ घोरत पडलेला असतो; पण निद्रा त्याच्यामध्यें अनेक क्रियांनीं व सुखदुःखांनीं युक्त असें स्वप्न निर्माण करिते, हें सर्वांस ठाऊक आहे. या दृष्टांताप्रमाणें या विकारशून्य आत्म्याच्या ठायीं ही ईश्वराची शक्ति असंख्य विकारांची कल्पना करिते. ॥९०॥

- मायेनें कोणकोणते पदार्थ निर्माण केले तें आतां सांगतात -

खानिलाग्निजलोर्व्यंडलोकप्राणिशिलादिकाः ।
विकाराः प्राणिधीष्वंतश्चिच्छाया प्रतिबिंबता ॥९१

अन्वयार्थ - [खानिलाग्निजलोर्व्यंडलोकप्राणि-शिलादिकाः विकाराः-] आकाश, वायु, अग्नि, उदक, पृथ्वी, ब्रह्मांड सत्यादिलोक, देवादि प्राणी व शिलादिक हे विकार होत. 'सर्व पदार्थ जर पंचभूतांपासून झालेले आहेत तर त्यांतील कांहीं जड व कांहीं चेतन असा भेद कां दिसतो ?' उत्तर -

[प्राणिधीषु अंत: चिच्छाया प्रतिबिंबिता-] प्राण्याच्या शरीरांतील अंत:करणात चैतन्याचें प्रतिबिंब पडतें, त्यामुळें त्यांस सचेतन म्हणतात; व ज्यांच्यामध्यें हा चैतन्याभास पडत नाहीं त्यांस जड म्हणतात.

प्रकाश:- आकाशादि सर्व विकार मायेपासून झालेले आहेत. शिलादिका:- येथील आदि शब्दानें वृक्ष, वेली, इत्यादि सर्व पदार्थ घ्यावे. वादी:- सर्व पदार्थ जर पंचमहाभूतांपासून झालेले आहेत तर त्यांतील कांहीं जड व कांहीं सचेतन असा भेद का दिसतो ? **सिद्धान्ती:**- ज्या प्राण्यांच्या अंत:करणांत चैतन्याचें प्रतिबिंब पडल्यामळ त्यांचा व्यवहार होऊं लागतो, त्यांस सचेतन म्हणतात: व ज्यांच्यामध्यें हा चैतन्याभास पडत नाहीं त्यांस जड म्हणतात. अर्थात् चेतन व अचेतन हा भेद औपाधिक आहे. ॥९१॥

- 'पण हा चेतनाचेतनभेद चिद्रूप ब्रह्मकृतच आहे, असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे ?' अशी शंका घेऊन 'ब्रह्म सर्वांचें उपादान असल्यामुळें सर्वत्र सम आहे. त्यामुळें तसें मानतां येत नाहीं,' असें समाधान करितात-

चेतनाचेतनेष्वेषु सच्चिदानंदलक्षणम् ।
समानं ब्रह्म भिद्येते नामरूपे पृथक् पृथक् ॥९२

अन्वयार्थ - [एषु चेतनाचेतनेषु सच्चिदानंद-लक्षणं ब्रह्म समानं-] या चेतनाचेतनांमध्यें सत्, चित् व आनंदरूप ब्रह्म समान आहे. [च नामरूपे पृथक् पृथक् भिद्येते-] आणि नांव व रूप भिन्न भिन्न होत असतें.

प्रकाश:- सचेतन व जड रूप अशा या द्विविध सृष्टीमध्यें ब्रह्म सर्वत्र सारखेंच भरून राहिलें आहे म्हणजेच त्याच्या सत्, चित् व आनंद या गुणांची सर्व सृष्ट पदार्थांत सारखीच व्याप्ति आढळते. यास्तव त्याच्या योगानें सृष्टीमध्यें जड व चैतन्य असा भेद झाला हें म्हणणे युक्त नव्हे. नांव व रूप हीं मात्र प्रत्येक पदार्थास भिन्न भिन्न असतात. त्यामुळें हा भेद औपाधिक आहे, ब्रह्मकृत म्हणजे स्वाभाविक नव्हे असा निश्चय होतो. ॥९२॥

- आतां चित् व जड या उभयतांसहि ब्रह्म साधारण कसें आहे, तें सांगतात -

ब्रह्मण्येते नामरूपे पटे चित्रमिव स्थिते ।
उपेक्ष्य नामरूपे द्वे सच्चिदानंदधीर्भवेत् ॥९३

अन्वयार्थ - [पटे चित्रं इव एते नामरूपे ब्रह्मणि स्थिते-] पटावरील चित्राप्रमाणें हीं नाम-रूपें ब्रह्मामध्यें स्थित आहेत. ब्रह्म सर्वकल्पनांचा आधार असल्यामुळें त्याला सर्वगतत्व आहे. 'तें कसें अवगत होतें ?' अशी आशंका घेऊन 'कल्पित नाम-रूपांचा त्याग केला असतां अधिष्ठान ब्रह्म अवगत होतें,' असें सांगतात - [अत: द्वे नामरूपे उपेक्ष्य सच्चिदा-नंदधी: भवेत्-] यास्तव या दोन्हीं नाम-रूपांची उपेक्षा करून सच्चिदानंदाच्या भावनेनें युक्त व्हावें.

प्रकाश:- चितारी वस्त्रावर अनेक चित्रें काढतो व तीं जरीं परस्पर विरोधी (विरुद्ध धर्मवालीं) भासलीं तरी त्या सर्वांस वस्त्राचा सारखाच आधार असतो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेंच नामरूपात्मक द्वैत ब्रह्माच्या ठायीं कल्पित असल्यामुळें त्यास ब्रह्माचाच आधार आहे. व तो सर्वत्र सारखा आहे. यास्तव त्या द्वैताची उपेक्षा केल्यास साधक ब्रह्मज्ञानी होतो. ॥९३॥

- आतां याविषयीं एक दृष्टान्त देतात -

जलस्थेऽधोमुखे स्वस्य देहे दृष्टेऽप्युपेक्ष्य तम् ॥
तीरस्थ एव देहे स्वे तात्पर्य स्याद्यथा तथा ॥९४

अन्वयार्थ - [जलस्थे अधे मुखे स्वस्य देहे दृष्टे अपि-] जलांतील अधोमुख अशा आपल्या देहाचें दर्शन जरी झालें, तरी [तं उपेक्ष्य तीरस्थे एव स्वे देहे यथा तात्पर्यं स्यात् तथा-] त्याची उपेक्षा करून मनुष्य तीरावरील आपल्या देहामध्येंच जसा तत्पर असतो - त्यालाच 'हा माझा देह' असें म्हणतो

त्याप्रमाणें नाम-रूपांची उपेक्षा करून साधक तदधिष्ठानभूत ब्रह्मामध्यें तत्पर होतो.

प्रकाश:- पाण्यांत आपलें शरीर जरी उलटें दिसलें तरी त्याच्याकडे जसा सुज्ञ ध्यान देत नाहीं, त्याप्रमाणें उत्तम मुमुक्षु नामरूपात्मक द्वैताकडे लक्ष देत नाहीं. तर तो नामरूपाच्या आधारभूत ब्रह्माकडे आपलें सर्व लक्ष्य ठेवितो, आणि त्यामुळें त्याला ब्रह्मसाक्षात्कार सहज होतो. ॥९४॥

-आतां सर्वलोकप्रसिद्ध असा आणखी दृष्टान्त देतात -

सहस्रशो मनोराज्ये वर्तमाने सदैव तत् ।
सर्वैरुपेक्ष्यते यद्वदुपेक्षा नामरूपयो: ।।९५

अन्वयार्थ - [मनोराज्ये सहस्रश: वर्तमाने-] मनोराज्य हजारों प्रकारें चाललें असतां [यद्वत् तत् सर्वै: सदा एव उपेक्ष्यते-] ज्याप्रमाणें तें सर्वांकडून सर्वदाच उपेक्षिलें जातें, [तद्वत् नामरूपयो: उपेक्षा कर्तव्या-] त्याप्रमाणें नामरूपांची उपेक्षा करावी.

प्रकाश:- प्राणी एकांतांत बसून नाहीं नाहीं तें मनोराज्य करितो; पण कांहीं वेळानें तें सर्व काल्पनिक आहे असें समजून तोच त्या सर्वांची उपेक्षा करितो हें सर्वांस ठाऊक आहेच. त्याचप्रमाणें नामरूपांची उपेक्षा करावी. ॥९५॥

- आतां प्रपंचाच्या वैचित्र्याविषयीं दृष्टान्त -

क्षणे क्षणे मनोराज्यं भवत्येवान्यथाऽन्यथा ।
गतं गतं पुनर्नास्ति व्यवहारो बहिस्तथा ।।९६

अन्वयार्थ - [मनोराज्यं क्षणे क्षणे अन्यथा अन्यथा एव भवति-] मनोराज्य क्षणोक्षणीं भिन्न भिन्नच होतें, [किंतु गतं गतं पुन: न अस्ति-] पण तें होऊन गेलेलें मनोराज्य पुनरपि रहात नाहीं; [तथा बहि: व्यवहार:-] त्याचप्रमाणें बाहेरचा व्यवहार समजावा.

प्रकाश:- प्रत्येक क्षणीं निरनिराळें मनोराज्य होतें, पण त्यांतील जी जी कल्पना होऊन जाते, ती ती फिरून येत नाहीं. तिच्यासारखी दुसरी जरी एकादी कल्पना कदाचित् मनांत आली, तरी ती स्वत: पुन: येत नाहीं, व तसें होणें शक्यहि नाहीं. या दृष्टान्ताप्रमाणेंच जो जो बाह्य पदार्थ आपण पाहातों, तो तो पूर्वी पाहिलेल्या दुसऱ्या पदार्थांस हटवून तिसरा पदार्थ पुढें येतो व हाच क्रम सर्व व्यवहारांत चालतो. पण एकदा भासलेला पदार्थ पुन: कधींहि भासत नाहीं. - कालचाच मनुष्य आज दिसतो; सकाळचाच पशु संध्याकाळीं गोठ्यांत येतो. व याप्रमाणें तोच तो पदार्थ वारंवार दिसत असतो, असें कदाचित् कोणी यावर म्हणेल, पण यास आमचें असें उत्तर आहे कीं, सकाळचाच पशु संध्याकाळीं गोठ्यांत आला हें म्हणणें सामान्य मनुष्यासच शोभण्यासारखें आहे. विवेकी पुरुष तर पदार्थामध्यें प्रत्येकक्षणीं बदल होत असल्यामुळें सकाळचा पदार्थ निराळा व संध्याकाळचा निराळा असें, तीच वस्तु प्रत्यक्ष दिसत असतांहि, सूक्ष्मदृष्ट्या मानतो. ॥९६॥

- त्याचेंच विवरण -

न बाल्यं यौवने लभ्यं यौवनं स्थाविरे तथा ।
मृत: पिता पुनर्नास्ति नायात्येव गतं दिनम् ।।९७

अन्वयार्थ - [बाल्यं यौवने न लभ्यम्-] बाल्यावस्था तारुण्यांत प्राप्त होण्यासारखी नसते; [तथा यौवनं स्थाविरे न लभ्यम्-] तसेंच तारुण्य वृद्धापकालीं लभ्य नसतें; [मृत: पिता पुन: न अस्ति-] मेलेला पिता पुनरपि प्राप्त होत नाहीं. [गतं दिनं न आयाति एव-] व गेलेला दिवस पुन: येत नाहींच.

प्रकाश:- या श्लोकांतील सर्व दृष्टांत अगदीं स्पष्ट आहेत, यास्तव विशेष विस्तार करण्याचं प्रयोजन दिसत नाहीं. ॥९७॥

-द्वैताच्या क्षणिकत्वाचा उपसंहार -

मनोराज्याद्विशेष: क: क्षणध्वंसिनि लौकिके ।
अतोऽस्मिन् भासमानेऽपि तत्सत्यत्वधियं त्यजेत् ।।९८

अन्वयार्थ - [क्षणध्वंसिनि लौकिके मनोराज्यात् क: विशेष-] क्षणभंगुर अशा या लौकिकांत मनोराज्याहून विशेष तो कोणता ? क्षणिकत्व सिद्ध करण्याचें प्रयोजन- [अत: अस्मिन् भासमाने अपि तत्सत्यत्वधियं त्यजेत्-] यास्तव हें भासत असलें तरी त्या विषयींची सत्यत्वबुद्धि टाकावी.

प्रकाश:- क्षणभंगुर अशा या द्वैतामध्यें व मनोराज्यामध्यें फरक मुळींच नाहीं. कारण तीं दोन्हीं क्षणिक आहेत. एवढ्याकरितां द्वैत जरी सत्यासारखें भासत असलें, तरी तें सत्य आहे, अशी भावना कधींहि करूं नये. ॥९८॥

- 'पण लौकिकाची उपेक्षा केल्यानें कोणता लाभ होतो ?' तें आतां सांगतात -

उपेक्षिते लौकिके धीनिर्विघ्ना ब्रह्मचिंतने ।
नटवत्कृत्रिमास्थायां निर्वहत्येव लौकिकम् ॥९९

अन्वयार्थ - [लौकिके उपेक्षिते ब्रह्मचिंतने धी: निर्विघ्ना भवेत्-] लौकिकाची उपेक्षा केली असतां ब्रह्मचिंतनामध्यें बुद्धि निर्विघ्नपणें स्थिर होते. तर मग ज्ञान्याचा व्यवहार कसा होतो ? उत्तर - [नटवत् कृत्रिमास्थायां लौकिकं निर्वहति एव-] नटाप्रमाणें कृत्रिम आस्था ठेविल्यानेंहि लौकिकाचा निर्वाह होतोच.

प्रकाश:- व्यवहाराची उपेक्षा केल्यावांचून मुमुक्षूची बुद्धि ब्रह्मचिंतनामध्यें पूर्णपणें स्थिर होत नाहीं. यास्तव द्वैताची अवश्य उपेक्षा करावी पण द्वैताची अवस्था सोडल्यावर प्रारब्धप्राप्त व्यवहार कसा होणार ? अशी कोणी शंका विचारील म्हणून सांगतात कीं, नटाप्रमाणें द्वैतावर कृत्रिम आस्था ठेविल्यानेंहि व्यवहार होऊं शकेल. नाटकामध्यें पुरुष स्त्रीवेष घेऊन स्त्रीप्रमाणेंच कृत्रिम व्यवहार कसा करून दाखवितो, हें सर्वांस ठाऊक आहेच. ॥९९॥

- 'ज्ञान्याचा व्यवहार मानल्यास त्याला विकारित्व प्राप्त होईल' अशी आशंका घेऊन 'बुद्धि जरी व्यवहार करीत असली तरी साक्षी आत्मा निर्विकार असतो,' असें सदृष्टान्त सांगतात --

प्रवहत्यपि नीरेऽध: स्थिरा प्रौढशिला यथा ।
नामरूपान्यथात्वेऽपि कूटस्थं ब्रह्म नान्यथा ॥१००

अन्वयार्थ - [नीरे प्रवहति अपि यथा अध: प्रौढशिला स्थिरा-] उदक वरून वहात असतांनाहि खालीं असलेली मोठी शिला जशी स्थिर राहते, [तथा नामरूपान्यथात्वे अपि कूटस्थं ब्रह्म अन्यथा न भवति-] त्याप्रमाणें नामरूपांचा जरी विपरीत भाव झाला, तरी कूटस्थ ब्रह्म अन्यथा होत नाहीं.

प्रकाश:- नदीमध्यें मोठमोठे दगड असतात, तिला पूर आला असतां त्याच्यावरून पाणी मोठ्या जोरानें वाहूं लागतें. पण त्यामुळें त्या दगडांच्या स्थितीमध्यें जसा कांहीं फरक होत नाहीं व ते जसेच्या तसेंच निश्चल असतात, त्याप्रमाणें बुद्धि कितीहि जरी संसार करीत राहिली तरी त्यामुळें कूटस्थास मुळींच विकार होत नाहीं. आणि त्यामुळें ज्ञानी पुरुषाच्या ज्ञानास व्यवहारद्वारा प्रतिबंध होत नाहीं. सारांश, कृत्रिम आस्थेनें ज्ञानी पुरुषाचा व्यवहार होऊं शकतो. ॥१००॥

- 'पण अखंड ब्रह्मामध्यें या ब्रह्मविलक्षण जगाचें भान कसें होणार ?' अशी आशंका घेऊन 'निरवकाश दर्पणांत सावकाश वस्तूंचे भान जसें होतें, त्याप्रमाणें' असें समाधान सांगतात -

निश्छिद्रे दर्पणे भाति वस्तुगर्भं बृहद्वियत् ।
सच्चिद्घने तथा नानाजगद्गर्भमिदं वियत् ॥१०१

अन्वयार्थ - [यथा निश्छिद्रे दर्पणे वस्तुगर्भ बृहत् वियत् भाति-] ज्याप्रमाणें छिद्ररहित आरशामध्यें, ज्यामध्यें अनेक वस्तु आहेत, असें आकाश भासतें, [तथा सच्चिद्घने इदं नानाजगद्गर्भं वियत् भाति-] त्याप्रमाणें सत् व चित् यांनीं पूर्ण अशा आत्म्यामध्यें हें विचित्र जगानें भरलेलें आकाश भासतें.

प्रकाश:- एकाद्या भींतीस आरशी टांगून ठेवावी व त्यांत पाहावें म्हणजे घरांतील सर्व पदार्थांसह घरांतील मोठें आकाश दिसतें. पण ज्या आरशींत हें

सर्व दिसतें, तिच्यामध्यें आकाशाचा लेशहि नसतो हें कोणासहि समजण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें सत्ता, चैतन्य, आनंद इत्यादिकांनीं परिपूर्ण व द्वैतशून्य अशा ब्रह्मामध्यें या विचित्र जगानें भरलेलें असें हें विभु आकाश दिसतें. ॥१०१॥

-'पण अदृश्य ब्रह्ममध्यें जगद्भान कसें होतें ?' अशी शंका घेऊन 'सच्चिदानंदप्रतीतिपुर:सरच जगत्प्रतीति येते' असें सदृष्टान्त सांगतात -

अदृष्ट्वा दर्पणं नैव तदंतस्थेक्षणं तथा ।
अमत्वा सच्चिदानंदं नामरूपमति: कुत: ॥१०२

अन्वयार्थ - [दर्पणं अदृष्ट्वा तदंतस्थेक्षणं न एव-] दर्पण न दिसतां त्याच्या आंतील वस्तूंचें दर्शन होणें शक्यच नाहीं. [तथा सच्चिदानंदं अमत्वा नामरूपमति: कुत:-] त्याप्रमाणें सत्, चित् व आनंदरूप आत्म्यास न जाणतां नामरूपाचें ज्ञान कोठून होणार ?

प्रकाश:- आरशांतील प्रतिबिंबाचें ज्ञान होण्यापूर्वी आरशाचें ज्ञान अवश्य आहे. अर्थात् आरसा दिसल्यावांचून त्यांतील प्रतिबिंब दिसणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें ब्रह्माचें ज्ञान झाल्यावांचून जगाचें ज्ञान होणेंहि शक्य नाहीं. कारण हें ब्रह्म आहे असें जरी अविवेकामुळें कोणास न भासले, तरी नामरूपज्ञान होणें या कार्यावरूनच त्याच्या अस्तित्वाचें अनुमान होऊं शकतें. ॥१०२॥

-'अहोपण नामरूपहि भासत असल्यामुळें निर्विषय ब्रह्माची प्रतीति कशी येणार ?' अशी शंका घेऊन त्याच्या ज्ञानाचा उपाय सांगतात -

प्रथमं सच्चिदानंदे भासमानेऽथ तावता ।
बुद्धिं नियम्य नैवोर्ध्वं धारयेन्नामरूपयो: ॥१०३

अन्वयार्थ - [प्रथमं सच्चिदानंदे भासमाने-] प्रथमत: सच्चिदानंद ब्रह्मामध्यें कल्पिलेल्या नामरूपात्मक प्रपंचांतील सच्चिदानंदाची प्रतीति येऊं लागली असतां [अथ तावता बुद्धिं नियम्य-] त्याचेंच बुद्धीनें ग्रहण करून - प्रपंचांतील सच्चिदानंदांतच बुद्धीचा निरोध करून [ऊर्ध्वं नामरूपयो: बुद्धिं न धारयेत् एव-] त्यानंतर नाम-रूपांमध्यें बुद्धीला कधींच धारण करूं नये.

प्रकाश:- सर्वांच्या अगोदर सच्चिद्घन आत्म्याचें भान होतें, असा दृढ निश्चय होऊन तसा प्रत्यय आला असतां, सर्व प्रपंचांत आत्मा भरला आहे असा बुद्धीच्या द्वारा विचार करून नामरूपात्मक द्वैतामध्यें बुद्धीस आसक्त होऊं देऊं नये. असें केल्यानें वाद्याच्या वरील शंकेस जागाच राहाणार नाहीं. कारण आत्म्याच्या गुणांमध्येंच बुद्धीस स्थिर केलें असतां त्याच्या पुढें होणारा नामरूपांचा भास सहजच नाहींसा होईल. ॥१०३॥

-सारांश-

एवं च निर्जगद्ब्रह्म सच्चिदानंदलक्षणम् ।
अद्वैतानंद एतस्मिन्विश्राम्यंतु जनाश्चिरम् ॥१०४

अन्वयार्थ - [एवं च निर्जगद्ब्रम्ह सच्चिदानंदलक्षणं भवति-] व ह्याप्रमाणें झालें असतां जगद्रहित ब्रह्म सच्चिदानंदलक्षण होतें; [एतस्मिन् अद्वैतानंदे जना: चिरं विश्राम्यन्तु-] या अद्वैतांनदामध्यें जन दीर्घकाल विश्रांति घेवोत.

प्रकाश:- ह्याप्रमाणें प्रथम भासणाऱ्या ब्रह्माच्या सच्चिदादि रूपांत बुद्धि निमग्न झाली असतां जगरहित ब्रह्मच सच्चिदादिरूप बनतें. हाच अद्वैतानंद होय. यामध्ये, सर्व लोक मोठ्या आनंदानें दीर्घ काल विश्रांति घेवोत. तात्पर्य, ब्रह्मानुसंधानांचा सर्वांनीं सतत अभ्यास करावा. त्यांतच खरा पुरुषार्थ आहे. ॥१०४॥

- आतां या अध्यायाचा उपसंहार करितात --

ब्रह्मानंदाभिधे ग्रंथे तृतीयोध्याय ईरित: ।
अद्वैतानंद एव स्याज्जगन्मिथ्यात्वचिंतया ॥१०५

अन्वयार्थ - [ब्रह्मानंदाभिधे ग्रंथे अयं तृतीय: अध्याय: ईरित: जगन्मिथ्यात्वचिंतया अद्वैतानंद: स्यात् एव-] ब्रह्मानंदसंज्ञक ग्रंथांतील हा तिसरा

अध्याय सांगितला. जगाच्या मिथ्यात्वचिंतनानें अद्वैतानंद होतोच.

प्रकाश:- या स्थळीं तेराव्या प्रकरणाची समाप्ति झाली. ब्रह्मानन्दांतील हा अद्वैतान्दसंज्ञक तिसरा अध्याय होय; जग मिथ्या आहे असें सतत चिंतन केल्यानें या अद्वैतानन्दाचा साक्षात्कार होतो. या प्रकरणांत अनेक युक्ति योजून अद्वैत व ऐक्य यांची सिद्धि केली आहे. ॥१०५॥

इति पञ्चदश्यां ब्रह्मानन्दे अद्वैतानन्दः ॥१३॥